# गीत महाभारत



म. ग्रं. सं. ठाणे
वाङ्मय.
2002.
REFBK-0016294
REFBK-0016294

६८४५५
९८१३६७

2002

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ६८४५५ वि: ८५१८२५
२००७ नों दि ९८।३।६७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्ध योजना

# गीत महाभारत

REFBK-0016294

९६२९४

डॉ. वा. शं. देशपांडे

श्री शारदा प्रकाशन, ५९४ नारायण पुणे २.

मूल्य ३ रुपये

प्रकाशक :

श्री. गो. वि. देशपांडे
श्री शारदा प्रकाशन,
५९४ नारायण पेठ, पुणे २

या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे व यातील गीतांचे गायन करण्यास अनुमती देण्याचे अधिकार सौ. किशोरी वामन देशपांडे, ४६३ कसबा, पुणे ११ यांच्या स्वाधीन आहेत.

मुद्रक :

वा. भ. जोशी
स्वामी समर्थ मुद्रणालय
१२०६, शुक्रवार पुणे २

# अर्पण पत्रिका

ती. सौ. ताई व ती. काका यांना आशी-
र्वादासाठी प्रथम वंदन करून त्यांच्याच
अनुज्ञेने मी हे पुस्तक ज्यांच्या बुद्धीत
व बाहूत या आजच्या भारतातून ‘महान
भारत’ निर्माण करण्याचे सामर्थ्य आहे
त्या सर्व भारतीय तरुणांना अर्पण करतो.

# विद्यमान गायक

१. श्री. मुकुंदराज गोविंद बुरसे

११५ बुधवार, जोगेश्वरीचा बोळ, पुणे २

२. श्री. मनोहर चांदोरकर

द्वारा / सौ. सुशीलाबाई सप्रे
' सावित्री सदन ' आंबेडकर रस्ता
दादर (जी. आय्. पी.) मुंबई १४

३. श्री. नारायण जोगळेकर

द्वारा / जी. एन्. काणे
मराठे टेक्सटाइल मिल्स, स्टेशनजवळ मिरज

# मनोगत—

आदर्शांवर असीम श्रध्दा पण त्याच बरोबर आदर्शवाद जीवनकलहात टिकावा म्हणून त्याला उत्कृष्ट व्यवहारवादाची जोड देण्याचे अद्वितीय कार्य भगवान् श्रीकृष्णांनी केले. भगवान् श्रीकृष्णांच्या चरित्रातील एक मोठे उद्‌बोधक पर्व म्हणजे महाभारत. महाभारताचे कथानक, त्यातील व्यक्तिरेखा आणि त्यातील घटना या पाहिल्या तर त्या केवळ परमेश्वराच्या प्रतिभेतूनच निर्माण झाल्या असाव्य त–तो इतिहास असावा–असेच वाटते. आणि एवढा मार्गदर्शक इतिहास पाठीशी असूनही आपण त्यातून काहीच न शिकता त्यातल्याच चुकांची पुनरावृत्ती करतो आहोत हे पाहून विषाद वाटतो आणि अस्वस्थताहि येते.

अशा अवस्थेतून या गीतांचा जन्म झाला आहे. वास्तविक महाभारताचे गीतरूपाने मोजक्या गीतांत दर्शन घडविण्याचे हे आव्हान स्वीकारण्याची माझी योग्यता नाही परंतु तरीही महाभारतासारख्या श्रध्देय ग्रंथाचे एक थोडासा शिक्षित म्हणून जे ऋण माझ्यावर आहे असे मला वाटते ते माझ्या कुवतीप्रमाणे मोडक्या तोडक्या शब्दात 'गीतमाले' च्या आजच्या लोकप्रिय माध्यमांत ठेवण्याचा हा प्रयत्न आहे. या माझ्या प्रयत्नांतून मूळ महाभारत वाचण्याची आणि त्याचे परिशीलन करण्याची बुद्धि वाचकांच्या मनांत निर्माण व्हावी एवढीच अभ्यर्थना.

या कार्यात मला अनेकांचे साहय झाले आहे. महाभारतावरील समग्र भाषांतरांचे ग्रंथ, श्री. द्रविड, श्री बाळशास्त्री हरदास, श्री. पेंडसे यांचे महाभारतावरील लिखाण यांचा संदर्भग्रंथ म्हणून मी वापर केला. आहे.

ही गीते जनसमुहासमोर सादर करण्यासाठी माझे ज्येष्ठ मित्र श्री. भवाळकर यांनी केलेल्या प्रयत्नाचा प्रथम उल्लेख केला पाहिजे. यांतील काही गीतांना अर्थानुकूल व बहुरंगी संगीत देण्याचे कार्य श्री. बबनराव कुलकर्णी यांनी केले. व त्याचे अनेक यशस्वी कार्यक्रम भावगीतगायक मुकुंदराज बुरसे यांनी केले त्याद्दल मी या सर्वांचा ऋणी आहे.

या कार्यक्रमांना जाणकार श्रोत्यांनी दिलेला प्रतिसाद व पुस्तक प्रकाशनाच्या त्यांनी वारंवार केलेला आग्रह य़ामुळेच हे पुस्तक प्रकाशित करण्याचे धाडस मला करवले.

या कार्यक्रमांना सरदार आबासाहेब मुजुमदार, संगीत कालानिधि मास्तर कृष्णराव, श्री. भा. द. खेर, श्री. मो. स. साठे, प्रा. मंगरूळकर. प्रा. राहुरकर, प्रा. भुपटकर, श्री. वि. वि. बोकील, श्री. दा. न. शिखरे या सारखे श्रोते लाभले. तर या गीतमहाभारताच्या केवळ गीतवाचनाच्या कार्यक्रमांना कवि शांताराम आठवले, डॉ. वा. भा. पाठक , डॉ. प्र. न. जोशी प्रा. वा. ल. कुलकर्णी, पंडित महादेवशास्त्री जोशी, श्री. वसंतराव देशपांडे यासारखे श्रोते मिळाले. ही महाभारताची पुण्याई. या सर्वांच्या सूचनांचे बहुमोल मार्गदर्शन मला लाभले आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

डॉ. वा. भा. पाठक यांनी ही गीते ऐकून व वाचून माझे जे कौतुक केले त्याबद्दल कोणत्या शब्दात त्यांना धन्यवाद द्यावेत तेच मला समजत नाहीं. त्यांच्या ऋणात राहण्यातच मला धन्यता वाटते.

स्थलाभावी इतर प्रमुख साहचकर्त्यांच्या केवळ नामोल्लेखच करतो. नू. म. वि. चे मुख्याध्यापक प्रा. दीक्षित, गु. त्र्यं. अ. गोडबोले व ग्रंथालय प्रमुख श्री. वि. अ. जोशी, माझे मित्र डॉ. पानसे व श्री. पानसे, श्री. दामले, श्री. बापट यांचा मी ऋणी आहे. चित्रकार भैय्यासाहेब ओंकार, प्रकाशक मित्र श्री. गो. वि. देशपांडे यांचा या गीतांना पुस्तकरूप देण्यात मोठाच वाटा आहे त्यांचाही मी ऋणी आहे.

या गीतमहाभारताच्या गीतांचे नव्याने गायन करणारे श्री. मनोहर चांदोरकर व श्री. नारायण जोगळेकर यांचाही मी ऋणी आहे. वरील उल्लेखात चुकून ज्या साहचकांचे नाव राहिले असेल त्यांनी उदार अंतःकरणाने मला क्षमा करावी.

गणेशचतुर्थी<br>
७–९–६७.<br>
४६३ कसबा, पुणे ११

**वा. शं. देशपांडे**

# अभिप्राय

डॉ. देशपांडे, यांनीं लिहिलेल्या 'महाभारतदर्शनां'तील काहीं गीतें मला प्रत्यक्षपणे कवींच्या मुखांतून ऐकावयास, आणि नंतर तीं पुनः मुद्रित स्वरूपांत वाचावयास मिळालीं. यांमुळ मला वरील गीतांतील गेयमधुरते-बरोबरच भावमधुरतेचा लाभ झाला.

महाभारतासारख्या आर्ष महाकाव्यांतील हृदयस्पर्शी वेंचक प्रसंग निवडून, त्यातील विविध वैशिष्टचपूर्ण अलौकिक व्यक्तींच्या स्वभावांतील मार्मिक छटा नाटचपूर्ण गीतांतून उघड करण्याचें दुर्मिळ कौशल्य कवींनीं 'महाभारतदर्शनांत' प्रकट केलें आहे. विशेष म्हणजे ज्या शाश्वत नीतीवर व सत्यनिष्ठेवर महाभारताची उभारणी झाली आहे त्या मूल्यांशी प्रामाणिक राहूनच कवींनीं ही भावगीतमाला गुंफिली आहे.

उदाहरणार्थ, कणिकनीति, कुंतीचा धावा, राजसूयज्ञ, द्यूतक्रीडा, विदुरबोध, द्रौपदीवस्त्रहरण भीमप्रतिज्ञा, श्रीकृष्णशिष्टाई, भीष्मार्जुन युद्ध कर्णाची रथचक्रोद्धरणीं भूमातेस विनवणी, युधिष्ठराचा नीतिपाठ, पांडवांचा विजय, या व अशा अनेक कवींच्या स्फूर्तीला कारणीभूत झालेल्या विषयांवर कवींनीं रचिलेल्या गीतांतून भावना आणि विचार यांचा समुचित संगम झालेला दिसून येतो. कवींच्या अभ्यासपूर्ण व प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्त्वाचेंही दर्शन त्यांतून होतें.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी कीं ज्या शाश्वतनीतीवर व सत्य-निष्ठेवर महाभारताची उभारणी झाली आहे, व जीं तत्त्वें त्रिकालाबाधित आहेत, त्या अढळ तत्त्वावरील कवींचा दृढ विश्वास अनेक गीतांना सूचकतेनें प्रकट झाला आहे. उदाहरणार्थ नियतीच्या स्वाधीन असलेल्या आपल्या जीवनासंबंधी कर्ण कुंतीला दोष न देतां म्हणतो

दुर्दैवानें शापित अवघें कर्णाचें जीवन
तुला तरी मी कुंती देऊं कशाच हें दूषण–आणि

कुंतीस आश्वासन देतो कीं "पाच राहतिल पार्थ शेवटीं युद्धानंतरही" तसेच शांतीप्रीत्यर्थ शिष्टाईला निघालेल्या श्रीकृष्णाला द्रौपदी विचारते–

तेरा वर्षे हृदयि धरोनी–
प्रतिशोधाचा प्रदीप्त वन्ही
जगेल का कुणि सांगा मानिनी–
संमति देण्या शांति :जपाला ?

याशिवाय, श्रीकृष्णानें युद्धारंभीं अर्जुनाच्या मनांतील घालविलेला विभ्रम, अभिमन्यूवधाचा अर्जुनाने केलेला धि:क्कार आणि त्याची प्रतिज्ञा, धृत-राष्ट्र गांधारी यांच्या मनांतील लढा, दुर्योधनाच्या अंतिम समयाचे, "जीवन जगलों सम्राटाचे" मरण कवटाळितो मी वीराचे हे उद्गार हीं व अशा अनेक स्थळीं कवींच्या पृथगात्म काव्य–सौंदर्याची प्रतीति येते.

कवींचा विनम्रभाव आणी आत्मविश्वास यांचा प्रत्यय त्यांनीं महर्षि व्यासांवर आरंभी व शेवटीं रचिलेल्या गीतांवरून येतो. त्यांतील खालील चरण उद्धृत करण्याचा मोह रसिकांना होईल यांत शंका नाहीं.

" ज्ञानभास्करा त्या तेजांतून–वेंचियले मी जे हें कण कण–
द्या आशीर्वच " घेवो त्यांतुन नवभारत आकार..."

कवीची ही सदिच्छा सफल होवो, व रसिकांना त्यांचें हे महाभारतदर्शन अक्षय आनंद देत राहो एवढें लिहून मी हा अभिप्राय संपवितो–

डॉ. वा. भा. पाठक.

# महाभारत-दर्शन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

दा. क्र. ९८२९८



नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे
फुल्लारविन्दायतपत्रनेत्र ।
येन त्वया भारततैलपूर्णः
प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ॥

घडता अपुल्या प्रतिभेमधुनी विश्वरूपदर्शन
विनम्र झालों सहजपणानें गळलें हें मीपण
शब्द न उरले पूजेसाठी स्फुरे मुखीं उच्चार
युगायुगांच्या मार्गदर्शका जय 'जय' जय 'जय'कार ॥

कुरुकुलांतील पराक्रमी राजा पांडू वनांत गेला असतां तेथेंच त्याचें निधन झालें. त्याच्या मृत्यूनंतर त्याची अनाथ पत्नी कुंती आपल्या निराधार मुलांना घेऊन आश्रयासाठी धृतराष्ट्राकडे आली. कौरवांच्या बरोबरच पांडवांचेंही शिक्षण सुरु झालें. अल्पावधीतच आपल्या शौर्यादि गुणांनीं पांडवांनीं सर्वांचींच मनें आकर्षून घेतलीं.

आपल्या भावाच्या मागें त्याचीं मुलें कर्तृत्ववान् निघालीं म्हणून वास्तविक धृतराष्ट्राला आनंद व्हावयास पाहिजे होता. परंतु नेमकी हीच गोष्ट त्याला सलूं लागली. पांडूकडून आपल्याकडे चालत आलेलें राज्य आतां युधिष्ठिराला परत द्यावें लागेल या विचारानें तो अस्वस्थ झाला. पांडवांच्या रूपानें आपण आपल्या शत्रूंनाच पोसत आहोंत असे त्याला वाटूं लागलें. रात्र रात्र त्याला झोप येईना. यावर उपाय म्हणून त्यानें, राजनीतींत अत्यंत निपुण असलेला आपला मंत्री कणिक याला बोलावून घेतलें. आणि त्याच्या समोर आपलें अंतःकरण उघडें केलें. व शेवटीं विचारलें, " कणिका, आतां तूंच मला मार्गदर्शन कर. तूं सांगशील त्याप्रमाणें मी वागेन. "

त्यावर कणिक म्हणाला, " राजा, पांडवांशीं कसें वागावें हें प्रत्यक्षांत सांगण्यापेक्षां राजानें कसें वागावें हें सांगणारी राजनीतीच मी तुला विशद करून सांगतों. ऐक

# कणिक नीति

कठोर मृदु हे मार्ग दोनही
सांगते राजा नीती ही ॥ ६६० ॥

स्थल, व्यक्ती वा काल पाहुनी
नवें रूप ही येइ धरोनी
क्षणीं मोहिनी क्षणीं सर्पिणी
न मानि साधन निषिद्ध कांहीं ॥ १ ॥

ठेवि लपवुनी चतुरपणानें
शत्रूपासुनि मर्मस्थानें
हेर परी तू काकदृष्टिनें
वर्म शत्रुचें अतीसूक्ष्म ही ॥ २ ॥

पुत्र, पिता वा गुरु ही नाती
ठरता शत्रू सर्व संपती
नाश तयांचा, मग विश्रांती
ध्यास धरी हा मनीं स्वप्निंहि ॥ ३ ॥

उपेक्षिलेल्या अग्निकणांतुनि
प्रगटुनि जाळी वन, दावाग्नी
शत्रु भयानक अग्निकणाहुनि
नये उपेक्षूं जरि दुर्बलही ॥ ४ ॥

करी शत्रुशी मृदु संभाषण
स्नेह प्रगट करि सत्कारांतुन
धार्मिकतेचें करी प्रदर्शन
गा मैत्रीची स्तुतिगीतेंही ॥ ५ ॥

प्रबळ तुझ्याहुनि जोवरि वैरी
खुशाल मिरवी त्यास शिरावरि
संधी साधुनि परी घटापरि
अपटुनि शतधा करि पाषाणी ॥ ६ ॥

दिसे घडे जरि स्पष्ट समोरी
वर्तन ठेवी कधि अंधापरि
घेइ बधिरता प्रसंगापरी
कार्य साधि वा मौनातुनही ॥ ७ ॥

शपथा घेउनि वचनें देउनि
कालहरण करि आशा दावुनि
प्रहारार्थ परि शस्त्र पाजळुनि
सिद्ध राहि तूं क्षणि कुठल्याही ॥ ८ ॥



कणिकाने सांगितलेल्या राजनीतीचें धृतराष्ट्रानें तंतोतंत पालन केलें. वरकरणी पांडवांवर गाढ स्नेह असल्याचें नाटक तो करीत होता. आणि आंतून मात्र पांडवांचा नाश करण्याची कारस्थानें रचीत होता. एकदा असेच एक महाभयंकर कारस्थान त्यानें रचलें. वारणावत नगरीत त्यानें एक लाक्षागृह बांधलें आणि त्यांत कुंतीसह पांडवांना जाळून टाकण्याची एक योजना त्यानें आखली.

पांडवांच्या सुदैवानें विदुरानें याची त्यांना अगोदरच पूर्वसूचना दिली होती. त्यामुळें धृतराष्ट्राची योजना पार पडण्यापूर्वी पांडवांनीं स्वतःच तें गृह पेटवून दिलें आणि ते संकटांतून बाहेर पडले. परंतु म्हणून संकटें संपलीं नव्हतीं. धृतराष्ट्र–दुर्योधनाचे हस्तक सर्वत्र विखुरले होते. त्यांनाही चुकवणें भाग होते. त्यासाठी रानावनांतून लपतछपतच पांडव मार्गक्रमण करूं लागले. अशाच एका रात्रीं अरण्यांतून प्रवास करतां करतां एका विशाल वट-वृक्षाखालीं ते आश्रयाला आले. दिवसभराच्या श्रमानें सर्व पांडवांना झोप लागली. पण कुंती...तिला झोप येईना. पांडूच्या निधनानंतर घडलेले एक एक प्रसंग तिच्या डोळ्यासमोरुन सरकूं लागले. त्या सर्वांचा ताण तिला असह्य झाला. पण हें दुःख ती व्यक्त तरी कुणासमोर करणार? त्या क्षणीं तिला उत्कटतेनें आठवण झाली...पांडूची! अनंतांत विलीन झालेल्या आपल्या प्रिय पतीची. अश्रूंनीं भरलेल्या आपल्या डोळ्यांसमोर त्याची मूर्ती उभी करीत ती म्हणाली,

कुंती :

पैल तुम्ही ऐलथडि मी
तरिहि तुम्हां हाक देतें
आणि माझ्या या व्यथांना
आसवांनीं वाट देते ॥ ध्रु. ॥

आपणासह वैभवानें
राजमंदिरिं मी मिरविले
शब्द नियता एक माझा
लक्ष सेवक नम्र झाले
मजसि स्वप्नांतरिहि तेव्हां
दुःख भ्यालें स्पर्शण्यातें ॥ १ ॥

पाहिल्या क्रीडा सुतांच्या
रंगलों दोघेहि आपण
भावि कालाचें तयांच्या
चित्र रचलें कल्पनेतुन
शापिलेल्या मानवासम
मर्त्य ठरलें चित्रही तें ॥ २ ॥

एक जाता निघुन आपण
पालटोनी विश्व गेलें
भोगिलें मी काय सांगूं
सांगण्याहि न धैर्य उरलें
स्नेह, ममता, बंधुता छेः
स्वार्थ येता सर्व सरते ! ॥ ३ ॥

जागतें भीमास माझ्या
घातलें विष कां, कुणी तें
उजळमाथा वावरे तो
पाहुनी त्या मीच झुकतें
ऊर करि आकांत परि ना
नांव घ्याया वाणि धजते ॥ ४

आज सत्ताधीश तो, तर
आश्रयार्थी गतधवा मी !
दुखवुनी कां त्या निमंत्रू
मरण पुत्रा आपुल्या मी ?
आंसवे कां, क्रोध, शापहि
मी उद्यांस्तव आज गिळतें ॥ ५ ॥

एक करतां तो इशारा
हो उभा प्रासाद ही तो,
भिंति भिंतीतून ज्याच्या
गुप्त अग्नी वास करतो !
क्रोध त्याचा दूर करण्या
अग्निही मी जवळ करितें ॥ ६ ॥

पेटवोनी गृह अखेरी
आज आम्ही मुक्त झालों
मृत्यु टळला एक केवळ
मुक्तभय ना अजुनि झालों
वावरे तो नाग अजुनी
विष तयाचें तें, जसें तें ॥ ७ ॥

म्हणूनि पुत्रांच्या सवें मी
घोर रानें तुडविते ही
आसरा या तरुतळाचा
भोवती अंधार, मीहि
टेकवीते शरिर थकलें
वैरि मन परि धांव घेते ॥ ८ ॥

हलति या शाखा तरूच्या
जाणतें मी, परि दचकते
आणि अंधारीं अशाही
दृष्टि कांही शोध घेते
कां तिथेही बैसले कुणि
प्राण हरण्या पांडवांचे ? ॥ ९ ॥

शब्द परिचित पाखरांचे
येति जाती सहज कानीं
चर्र काळिज होइ माझें
कोण आले याहि रानीं
घ्यावया चाहूल त्याची
मी खुळ्यापरि धाव घेतें ॥ १० ॥

दूत, हस्तक कौरवांचे
दशदिशा व्यापून उरले
रस घ्याया पांडवांचा
लक्ष हे राहू विखुरले
पांच सूर्या लपविणारा
शोधु मी अंधार कोठे ? ॥ ११ ॥

मिटुनि डोळे प्रार्थितें मी
मागतें मी एक नाथा
भास अपुल्या दर्शनाचा
हाहि मज, आधार आता
लाभुं द्या तो फिरुनि मी मग
झुंज घ्याया सिद्ध होते
आज माझ्या मी व्यथांना
आसवांनीं वाट देते ॥ १२ ॥

व्यथांना आणि दुर्दैवालाही शेवट असतो. कुंतीचें आणि पांडवांचें दुर्दैवही संपण्याचा प्रसंग लौकरच आला. द्रुपदानें आपली मुलगी द्रौपदी हिचें स्वयंवर मांडलें होतें. अप्रतिम लावण्याची देणगी लाभलेल्या द्रौपदीच्या प्राप्तीसाठीं देशोदेशीचे राजे, पराक्रमी वीर स्वयंवराच्या मंडपांत जमले होते. त्यांत शल्य, दुर्योधन, कर्ण यासारखे पराक्रमी वीर स्पर्धक म्हणून उतरले होते. तर तो समारंभ केवळ पहाण्यासाठीं कृष्ण, बलराम यासारखे यादववीर प्रेक्षागारांत उपस्थित होते.

या स्वयंवराला पांडवहि उपस्थित राहिले. पण कसे ? ब्राह्मणाच्या वेशांत ! आपल्याला कोणी ओळखणार नाही अशी दक्षता घेत. स्वयंवर सुरु झालें. निवेदक वर्णन करून सांगू लागला.

निवेदक :

सौंदर्याला सामर्थ्याचे
आज वेध लागले
स्वयंवर कृष्णेचे चालले ॥ ध्रु. ॥

सुवर्ण मौक्तिक रत्नें लेउन
सजला मंडप प्रसन्नदर्शन
स्वागततत्पर नृपसेवकगण
ना कुठे न्यून काही उरले ॥१॥

फुलला मंडप वीरवरांनीं
गंभिर त्यांचा हो मर्मरध्वनि
क्षणांत का तो विरुन जाउनी
टाकि शांतता निरव पाडले ॥२॥

विनम्र मस्तक तो ये युवती
सौंदर्याची शिल्पकृती ती
मंत्रमुग्धसे नृप भारावति
ओठि शब्द उरि श्वास थबकले ॥३॥

घनगंभिर तो कर्णपथावर ध्वनि येई कोठुनी
द्रुपदपुत्र हा सांगतसे पण नृपास समजावुनी
करावयाचे सज्ज धनू हें सामर्थ्याने प्रथम नमवुनी
चक्राकारें लक्ष्य फिरतसे टाकावें मग त्यास वेधूनी
आज कसोटी धनुर्धरांनो करा प्रगट कौशल्य आपुलें
जिंकिल जो पण, त्यास वराया या कृष्णेसह भाग्य थांबले ॥४॥

वीरामागुन वीर धावले
घेउनि अपयश सर्व परतले
धनुष्य दृढ तें लव न वाकलें
वाकली निष्प्रभ मुखमडलें ॥५॥

मग आवेशानें
नमविलें धनुष्य त्यानें
भेदिल कां हा लक्ष्य' शरानें
नृपांचे लोचन विस्फारले ॥६॥

'थांबा' वाणी येइ कुठोनी?
समोर पाही कर्ण चमकुनी !
"वरिते सूता कां क्षत्राणी ?"
शरसे वच कृष्णेंचे सुटले ॥७॥

करी प्रकट ती हेतु मनीचा
धक्षेप परि हो कर्णाचा
दोष कुणाचा? तिचा न त्याचा
नियतिनें दोघेही बांधले ॥८॥

कर्ण अधोमुख ये स्वस्थानीं
खिजले नृपही खिळति आसनीं
पण जिंकाया धजे न कोणी
भूतली वीरच कां नुरले ? ॥९॥

उठे कोण हा? हा तर ब्राह्मण
करी यत्न तरि कशा अकारण?
नव्हे स्वयंवर जप वा पूजन
उपहासानें कुणी म्हणाले ॥१०॥

उपेक्षुनी तें निंदाभाषण
पुढे येइ तो भस्मविलेपन
पाहताच का क्षण त्या निरखुन
प्रेक्षागारीं कृष्ण हासले? ॥११॥

निमिषांतच त्या नरोत्तमानें
सहज नमविलें धनु लीलेनें
फुलली कृष्णा रोमांचानें
अनिमिष शोधी कांहि हरवले ॥१२॥

सुटला शर तो धनुष्यातुनी
अचूक गेला लक्ष्य भेदुनी
तृप्त वधू ती मिटे पापणी
प्रेयासह निज श्रेय गवसलें
स्वयंवर कृष्णेचें जाहलें ॥१३॥

पांडव लाक्षागृहांत जळून गेले अशीच सर्वांची कल्पना होती. त्यामुळें भीष्मांचें मस्तक तर सुन्न होऊन गलें होतें. त्यांची झोपही पार उडून गेली होती. परंतु सुदैवानें ती वार्ता खोटी ठरली. द्रौपदीच्या स्वयंवरानंतर पांडव कुशल आहेत हें वृत्त सर्वांनाच समजलें. तें भीष्मांच्या कानावर गेलें तेव्हां गतेतिहासाची पुनरावृत्ती नको म्हणून धृतराष्ट्राची कान उघाडणी करून त्याला उपदेशाचे चार शब्द सांगण्यासाठी भीष्म त्याच्याकडे गेले आणि त्याला म्हणाले--

# भीष्म

कुरुकुलांत स्वप्निंहि जें कुणी न कल्पिलें
राजा तूं तें अभिनव पर्व उघडिले
धृतराष्ट्रा तूं अभिनव पर्व उघडिले ॥ ध्रु ॥

आततायि पुत्र तुझा तुजसि सांगतो
मोहविवश तूंहि सर्व कसे ऐकतो
लोभाची आज मधुर अति कटु फलें ॥१॥

लाक्षागृह पार्थासह दग्ध जाहलें
ऐकताच वृत्त काय पौर बोलले
जळले ना पांडव त्या तूंच जाळले ॥२॥

क्षुब्ध प्रजा होय जिथें सर्व यापरी
टिकते ना नृपसत्ता तिथे क्षणभरी
अजुनि तरी योग्य तींच टाक पाउलें ॥३॥

कुशल पार्थ कुंतीही आज वृत्त ये
मानी हें नवजीवन तुजसि लाभले
घेउनि हो संधी तूं जोडि तोडिलें ॥४॥

जवळ घेइ पार्थातें देइ स्नेह तू
पांडवांत कौरवांत घडवि ऐक्य तूं
पाहूं दे कुरुयश मज फिरूनि उजळलें ॥५॥

शब्द बोलसी न अजुनि काय तव मनीं ?
संपावें कुरुकुल का वैर माजुनी
प्राशितोस कां विष जें कुणि न पचविलें॥६॥

सांगतो हितार्थ तुझ्या हें अखेरचें
जाणतोस तूंही हें राज्य पांडुचें
अर्धे तरि धर्मासी देइ त्यांतलें ॥७॥

स्वयंवरानंतर द्रौपदी अर्जुनाची आणि पांडवांचीही पत्नी झाली. तिच्या पायानें खरोखरच पांडवांचें भाग्यच त्यांच्याकडे चालून आलें. पराक्रमी परंतु निराधार असलेल्या पांडवांच्या मागें द्रुपदाची समर्थ सत्ता राहिली. हा बदल धृतराष्ट्राच्याही लक्षांत आला. त्यांतच भीष्मांनीं धृतराष्ट्राला स्पष्ट बजावलें, "धृतराष्ट्रा, राज्यासाठीं कौरवांची आणि पांडवांचीं अशीं भांडणें चालणार असलीं तर तूं सरळ या राज्याची विभागणी कर. पांडवांना त्यांचा अर्धा भाग तूं देऊन टाक."

राज्यावर न्यायानें संपूर्ण अधिकार असतांनाही, कुरुकुलाचा नाश टळावा म्हणून मोठ्या उदार अंतःकरणाने युधिष्ठिरानें या निर्णयाला मान्यता दिली.

राज्याची विभागणी करतानाही धृतराष्ट्रानें आपळें कौशल्य दाखविलेंच. कुरुजांगालाचा समृद्ध प्रदेश त्याने स्वतःकडे ठेवला. व केवळ अरण्यप्राय असलेला खांडवप्रस्थाचा प्रदेश त्यानें धर्माला दिला. तेथे कृष्णाच्या मार्गदर्शनाखाली पांडवांनीं आपली प्रगति चालू ठेविली. कोणत्याही राज्याच्या सीमा पराक्रमानें ठरतात. या न्यायानें पराक्रमी पांडवांनी यातूनच एक साम्राज्य निर्माण केलें आणि खांडवप्रस्थातून इंद्रनगरीला लाजवील अशी इंद्रप्रस्थ नगरी उभी केली. युधिष्ठिर 'सम्राट युधिष्ठिर' झाला आणि हें उद्घोषित करण्यासाठीं त्यांनीं 'राजसूय' यज्ञ केला. त्याबरोबर एक प्रचंड मयसभाही उभारण्यांत आली.

हा राजसूय यज्ञ मोठ्या वैभवानें थाटामाटांत पार पडला. भीष्मांच्या सूचनेवरून आपल्या मार्गदर्शक कृष्णाला पांडवांनीं अग्रपूजेचा मान दिला. आपली निंदा करणाऱ्या शिशुपालाला स्वतः कृष्णानींच यमसदनाला पाठविलें.

यज्ञ पार पडला. कृतार्थ अंतःकरणानें सर्व घरोघर परतले. पण तो यज्ञ व त्यांतील पांडवांचें वैभव पाहिल्यावर दुर्योधनाचा मात्र जळफळाट झाला. आपला मामा शकुनी याला तो म्हणाला—

# दुर्योधन

यज्ञकुंडिचा विझला अग्नी धर्म तृप्त जाहला
द्वेष उफाळुन शरिरीं माझ्या रोम रोम पेटला ॥ ध्रु ॥

पराक्रमानें पंडुसुतांच्या कापें हें त्रिभुवन
पांडव पांडव एक राहिला घोष दिशा व्यापुन
अजिक्य ठरले वैरी, बांधव लाभुन दैवदला ॥ १ ॥

अमरपुरीही व्हावि अधोमुख पाहुनि जें वैभव
त्या विभवाचे स्वामी ठरले य:कश्चित पांडव
दारिद्र्याची जाणिव लज्जित करुनी गेली मला ॥ २ ॥

युधिष्ठिराच्या अभिषेकाचा विसरूं कसा सोहळा ?
रूपदेवता शिंपित होत्या मस्तकि तीर्थजला
देवेंद्रच तो या भूवरती दिसला अवतरला ॥ ३ ॥

चरणावरती त्याच्या अगणित संपत्ती वाहुनी
उभे राहिले नमवुनि मस्तक राजे कर जोडुनी
वेश्येपरि ते रिझवित होते, करुनि स्तुती त्याजला ॥ ४ ॥

दिधला त्यांनीं गोपालाला अग्रपुजेचा मान
भूपालांचा करील कां कुणि याच्याहुनि अपमान ?
बुद्धिभ्रंश हो वृद्धांनाही नमले ते त्याजला ॥ ५ ॥

यज्ञपशूपरि कृष्ण उडविता शिशुपालाच्या शिरा
पांडवधाके कांपत होते सर्व कसे थरथरा
भृकुटी तरि कां वक्र कराया धजला कुणि त्यातला ॥ ६ ॥

जरा कुठे मयसभेंत त्या मी पडलों ठेंचाळुनी
तो भीमाचे प्रलाप गेले काळजांस भेदुनी
" अंधाचा हा पुत्र जरा द्या हात कुणी याजला " ॥ ७ ॥

भीमासह त्या हंसले पांडव, द्रौपदिही हांसली
जळजळीत मी दृष्टि तिच्यांवर त्यासरशी रोखली
तो हास्याचा प्रतिध्वनी त्या डंखुनि गेला मला ॥ ८ ॥

शत्रूवभव पाहण्यास कां मानी जगतो कुणी ?
अग्निप्रवेशहि सुसह्य मजला या अपमानाहुनी
शरिरासह या दग्ध होउं दे दाह जीवनांतला "॥ ९ ॥

'पांडवांचे हें वैभव पाहाण्यापेक्षां अग्निप्रवेश करून जीव द्यावा असें मला वाटते' हे दुर्योधनाचे उद्गार ऐकल्यावर त्याच्या मनाचा पूर्ण अंदाज शकुनीला आला. पांडवांचा नाश करतां येईल असें कोणतेंही कृत्य आतां दुर्योधन करावयाला माघार घेणार नाही हें त्यानें ओळखलें. तो दुर्योधनाला म्हणाला, "दुर्योधना, पराक्रमानें पांडवांचें वैभव मिळविणें सर्वथा अशक्य आहे. परंतु तुझा विरोध नसेल तर रक्ताचा एक थेंबहि न सांडतां पांडवांचें हें सर्व वैभव मी तुझ्या पायाशी आणून सोडतों.

हे पहा युधिष्ठिराला द्यूत खेळण्याची अतिशय आवड आहे. पण द्यूतांत तो अत्यंत कच्चा आहे. तो माझ्याशीं द्यूत खेळेल अशी तूं व्यवस्था केलीस तर त्या द्यूतांतून मी तुला त्याचें राज्य हरण करून देतो."

शकुनीच्या विचाराला दुर्योधनानें संमती दिली. आणि तो विचार स्वतः धृतराष्ट्राला बोलून दाखवला. धृतराष्ट्रानें वरवर खूप आढे-वेढे घेतले. परंतु मनातून त्याची संमती होतीच. त्यानें धर्माला द्यूताचें निमंत्रण दिलें.

धृतराष्ट्राला वडिलांच्या ठिकाणी मानणाऱ्या धर्मानं विचार केला, 'निमंत्रण धृतराष्ट्राचे आहे. वडील कां कधी आपल्या मुलाचें अनहित करतील ?

तो द्यूत खेळण्यासाठी गेला. द्यूत सुरू झाले. उघड उघड कपटद्यूतच होते तें ! धर्मराज डावामागून डाव हरू लागला. या द्यूताचा उद्देश काय आणि निर्णय काय लागणार या दोन्ही गोष्टी दूरदर्शी विदुराच्या ताबडतोब ध्यानांत आल्या. तो ताडकन् उठून उभा राहिला. ज्याच्या संमतीने हे द्यूत चालू होते आणि ज्याच्या आज्ञेनें ते थांबू शकणार होते त्या धृतराष्ट्राला तो म्हणाला,

विदुर :

समय अजुनि करि विचार तूं विचक्षणा
धृतराष्ट्रा थांबवि हे द्यूत या क्षणा ॥ ध्रु ॥

मरणोन्मुख रूग्ण तया
पथ्यें ना रुचति जशी
हितवचनें आजवरी
रूचलीं ना तुज तैसी !
स्पष्ट सांगतों तरिही मान, मान ना ॥ १ ॥

निंद्य कपटद्यूतानें
अपहरुनी पांडवधन
धर्मावरि पार्थांच्या
घाव घालि दुर्योधन
त्या मूढा मौन तुझें देइ प्रेरणा ॥ २ ॥

द्यूतातिल विजयांनीं
हर्षसि कां तूंहि मनी ?
पेटवितो युद्धकुंड
पुत्र तुझा हातांनीं
जळतांना जाळिल हा बंधुप्रियजना ॥ ३ ॥

पित्यापरी तुजवरती
पार्थ स्नेह हे करिती
कां त्यांच्या स्नेहाहुन
अधिक तुजसि धन-कांचन ?
देउनि हृतधन तयास जोडि चिरधना ॥ ४ ॥

होतिल या द्यूतांतुन
पार्थ विद्ध, अपमानित
सहिष्णु कां म्हणुनि कुणी
राहतो सदाच शांत ?
घासताच चन्दनही पेटवी वना ॥ ५ ॥

उल्लंघिल आज्ञा तव
अमर्याद दुर्योधन
भीति जरी ही तुजसी
हो कठोर एक क्षण
बंदिवान करण्या त्या सांग अर्जुना ॥ ६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६२९८

# धृतराष्ट्र :

'धृतराष्ट्रा थांबावि हे द्यूत या क्षणां' असें विदुरानें बजावून सांगितले. पण द्यूतांतील निर्णय संपूर्णतया आपल्याला अनुकूल आहेत हें धृतराष्ट्राला स्पष्ट दिसत होते. तो धूर्तपणानें विदुराला म्हणाला, "विदुरा, तुझें म्हणणें योग्य आहे. पण दैवांत जें लिहिलेलें असेल तें मी किंवा तूं कसें काय टाळणार ?"

द्यूत चालूच राहिले. त्यांत धर्मानें आपली सर्व संपत्ती आणि राज्यही गमावलें. हरणारा अधिक हट्टाला पेटतो तसें धर्माचें झालें. त्यानें आपल्या भावांना आणि स्वतःलाही पणाला लावले. हेही डाव तो हरला. शेवटी तर पणाला लावायला कांहीच शिल्लक न राहिल्यानें त्यानें द्रौपदीलाच पणाला लावले. क्षणभर शकुनीच्या हातांतले फांसे खळखळले. ते हवेत फेकले गेले आणि जमिनीवर पडले. हा शेवटचा डावही धर्मराज हरला.

आणि नंतर...नंतर काय घडलें तें करुणवाणीनें निवेदक सांगूं लागला,



## निवेदक :

प्रतिकाराविण सरे पराक्रम
कपट खळाळुन हांसे
पुरुषार्थाला जिंकुन गेले
द्यूताचे फांसे
नियत कां चुकते कोणाला ?
आणिले सभेंत पांचालिला ।। १ ।।

द्रुपद-कन्यका पांडवपत्नी
क्षणापूर्विची कुरुसम्राज्ञी
हिसडित ओढित, केश धरोनी
एकवस्त्र त्या रजस्वलेला ।। २ ।।

केश विखुरले भाळि मस्तकी
पदर घसरुनी पडे खालती
भीष्म, द्रोण, कृप निमुट पाहती
धर्महि नमला बलदंडाला ।। ३ ।।

दुर्योधन तिज हांसुनि बोले
" पांडवास मी आज जिंकिले
दास्यच ज्यांना जीवन उरलें
संगत त्यांची तुला कशाला ? ।। ४ ।।

आज मनोरथ येइ फळासी
ये पांचाली माझ्यापाशी
अधीर मांडी भेटायासी
आसुसली तव मृदु स्पर्शाला " ! ।। ५ ।।

वदे द्रौपदी, " हे दुर्योधन,
पराक्रमा तव शोभे भाषण
कपटबलानें पांडव जिंकुन
शौर्य सांगसी त्याचे मजला ॥ ६ ॥

काळाची मज लागे चाहुल
बलिदाना हो उत्सुक कुरुकुल
कोण अन्यथा सभेंत आणिल
एकवस्त्र मज पतिव्रतेला ?" ॥ ७ ॥

" पतिव्रता तुज म्हणेल कां कुणि ?"
मधेच बोले कर्ण अडवुनी
" तुला भोगिले पांच पतींनी
कशास तोरा भोगदासिला ? ॥ ८ ॥

दाखवितो तुज तुझी पायरी
एकवस्त्र ही कृपा तुजवरी
दुःशासन, हो पुढे सत्वरी
विवस्त्र करि भर सभेंत हिजला " ॥ ९ ॥

भुजंगकर अपुला सरसावुन
वस्त्र हराया ये दुःशासन
अखेरचें करि सति आक्रंदन
आळविते ती जगदीशाला ॥ १० ॥

" हे कंसांतक हे मधुसूदन
सनाथ मज, करि अनाथ हा क्षण
असशिल तेथुन येरे धावुन
लाज भगिनिची राखायाला " ॥ ११ ॥

वादळी वाऱ्यानें एखादी केळ थरथरावी त्याप्रमाणें द्रौपदी त्या सभेत थरथरत उभी होती. आर्त स्वरानें हाक देत होती. आपल्याला आधार सापडतो का हें पहात होती.

परंतु तिचे रक्षणकर्ते पांडव ··· दास झालेले पांडव खालीं माना घालून ते सारे सहन करीत होते. शौर्य शब्दांत गुंतून पडले होते. कौरवांचा उन्मतपणा क्षणाक्षणाला वाढत होता.

शेवटीं हा सर्व प्रकार भीमाला असह्य झाला. संतापानें तो लाल झाला प्रलयकालाचें आगमन सुचवणारी दुंदुभी झडावी तशा आवाजांत त्यानें गर्जना केली. निवेदक सांगतो,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांक
अनुक्रम ७४६६५ दि: ७।१०।८७
वर्ग २००२ नोंद दि. १४।३।८७

**भीम :**

कालडिडिमासमान भीम गर्जतो
मूर्तिमंत क्रोध जणूं आग ओकतो ! ॥ ध्रु ॥

द्यूत कां युधिष्ठिरा कुणि न खेळले ?
पत्निला पणास एक तूंच लाविले
दोष तुझा, हात तुझे प्रथम जाळतों ॥ १ ॥

धृतराष्ट्रा पुत्र तुझा नावरे तुला
सत्तामद तुजहुनि करि अंध त्याजला
मदोद्धता बाहुबलें मीच नमवितों ॥ २ ॥

भीष्म द्रोण पूज्य तुम्हीं अनय साहतां ?
दास्यानें शौर्या कां येइ विवशता ?
मूक तुम्हां पाहुनिया क्रोध जाळतो ॥ ३ ॥

मांडि उघडि दाविलीस तूं सुयोधना
निर्लज्जा करितोसी वर्तन वल्गना
शासन या धारिष्टा ऐक सांगतों ॥ ४ ॥

वज्रगदा माझी ही पाहि निरखुनी
मजसमान उत्सुक तुज भेटण्या रणीं
आघातें मांडि तिच्या चुरुनि टाकितों ॥ ५ ॥

दु:शासन ओढिलेस केश तूं जयें
हात तुझा या क्षणि क्षणिही कापतो भयें
समरिं त्यास छिन्न भिन्न करुनि टाकतों ॥ ६ ॥

घुसळुनि तुज टाकुनि तव वक्ष भेदुनि
घेउनिया हात तुझ्या रुधिरिं क्षाळुनी
अपमानित कृष्णेचे केश बांधतों ।। ७ ।।

पुत्रशतीं धृतराष्ट्रा गर्व तव वृथा
पाहि घडे काय तूंहि भीम कोपता
तर्पणास एक न तुज पुत्र ठेवतों ।। ८ ।।



भीमाचें तें रुद्र स्वरूप, विदुरानें केलेली मध्यस्थी व स्वतः गांधारीने राजसभत येऊन पांडवांच्या सुटकेचा केलेला प्रयत्न, या सर्व गोष्टींचा परिणाम होऊन धृतराष्ट्रानें द्यूताचा निर्णय रद्द करून टाकला. त्यानें पांडवांना दास्यातून मुक्त केले व त्यांचें राज्य त्यांना परत दिल्याचें उद्घोषित केले परंतु आपल्या मुलांनीं समर्थ पांडवांना दुखावले आहे हे तो जाणून होता. पांडवांच्या क्रोधाची धार कमी करण्यासाठी त्यानें धर्माला जवळ बोलाविले. आणि गोड शब्दात गहिवारल्या कंठानें तो कुटिलनीतिप्रविण धृतराष्ट्र त्याला म्हणाला.



धृतराष्ट्र :

कुशल पुत्र राहो याविण चिंति काय तात ?
निरोप घे वत्सा धर्मा रहा तूं सुखांत ।। धृ. ।।

इथे द्यूत घडलें जे ते तुझ्या रंजनार्थ
जिंकि कोण हरलें वा त्या तेवढाच अर्थ
कलह कृतक तेही भरण्या रंग क्रीडनांत ।।१।।

दिवस फार भेटुनि झाले तुम्हां पांडवांना
वाटलें उजाळा द्यावा लोपल्या स्मृतींना
निमंत्रिले म्हणुनी तुम्हा द्यूत हें निमित्त ।।२।।

जाहले इथें नव्हते तें मला अभिप्रेत
नको तेहि घडुनी जातें खेळताच द्यूत
अंतराय तो न ठरावा स्नेहभावनेंत ।।३।।

अज्ञ अजुनी दुर्योधन तूं करी क्षमा त्याला
विसर रोष जवळी घे दे प्रेम तूं तयाला
ज्येष्ठ बंधु केवळ ना तूं तूंच त्यास तात ।।४।।

सांग तूंच समजावोनी बंधु पांडवांना
नका मनीं देऊं थारा कटू भावनांना
क्रोध भीमसेनाचाही करी तूंच शांत ।।५।।

बंधुप्रेम पाहुनि तुमचें तुष्ट जाहलों मी
स्नेह हाच द्या कुरुपुत्रां हेंच प्रार्थितों मी
जा प्रसन्नचित्तें, पाही वाट इंद्रप्रस्थ ।।६।।

धृतराष्ट्रानें पांडवांना मुक्त केले हें दुर्योधनाला आवडले नाहीं. त्यानें धृतराष्ट्राला सांगितले. " मी पांडवांना दुखावले आहे. तेव्हां त्यांना मोकळे सोडून चालणार नाहीं. मला निदान आणखी एक द्यूताचा डाव खेळू द्यावा. त्यामुळें द्यूताचा आणखी एक डाव खेळला गेला. व त्यात पांडवांच्या वाट्याला बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास आला.

कौरवांशी युद्ध अटळ आहे हें धर्माच्या ध्यानांत आले. तेव्हां कौरवापेक्षांही आपले अस्त्रसामर्थ्य वरचढ असावें म्हणून त्यानें अर्जुनाला दिव्यास्त्रें शिकून येण्यासाठीं पाठवले. धर्माची अनुज्ञा घेऊन अर्जुन निघाला. त्याने प्रथम शंकराची आराधना केली. अर्जुनाचे युद्धकौशल्य पहाण्यासाठी स्वत: भगवान् शंकरांनी किराताचा वेष घेतला आणि अर्जुनाची परीक्षा घेतली. त्याच्या युद्धकौशल्यानें प्रसन्न होऊन त्यांनीं त्याला पाशुपतास्त्र दिलें

नंतर अर्जुन इंद्राकडे गेला. इन्द्रानेंही त्याला दिव्यास्त्रे दिलीं. तेथा इंद्राच्याच आज्ञेवरून त्यानें निवातकवच दैत्यांचा पराभव केला. त्या पराक्रमाचा गौरव करण्यासाठीं इंद्रसभेत देवेंद्रानें त्याला आपल्या अर्धासनावर बसविले आणि एक दैदिप्यमान किरीट त्याच्या मस्तकावर ठेवला. त्याला अनेक दिव्य भेटी दिल्या. इंद्राचा निरोप घेऊन अर्जुन आपल्यभावांकडे परत आला. व त्यानें आपण अस्त्रसपादन कसें केलें याचें वृत्त त्यांना सांगितलें. द्रौपदीही तेथें होतीच.

त्या रात्रीं जेव्हां अर्जुनाची व द्रौपदीची भेट झाली तेव्हां इंद्रानें दिलेल्या भेटी अर्जुनानें द्रौपदीला दिल्या...पण त्याने द्रौपदीचें समाधान झाले नाही. ती अर्जुनाच्या जवळ आली आणि त्याला म्हणाली.

**द्रौपदी :**

आपुल्या मुखानें आपण मजला नाथा
ऐकवा आपुली फिरुनि पराक्रम गाथा ॥ ध्रु. ॥

झुंजला कसे त्या किरातवेषहरासी?
शर शरास भिडले अस्त्रें अस्त्रा कैसी ?
विलसली रुद्रमुखि प्रसन्नता कधि कैसी ?
शिव काय बोलले पाशुपतातें देता ? ॥१॥

वधिलेत तुम्ही त्या निवातकवचा कसे ?
सुरसभेत झालें स्वागत आपुलें कसें ?
बसविले आसनी इंद्रानें मग कसे ?
हा किरिट चढविला कोणी अपुल्या माथा ? ॥२॥

कां मूक तुम्ही मी भलते कां मागते ?
हें वेडे काळिज ओढहि वेडी घेते.
या अशा क्षणीं हें मजहि अनावर होते
शांतवा तुम्हिच या शौर्यपूजका आता ॥३॥

कां उगा रोखता ओघवती रसवंती ?
कां अधिक मजहुनि प्रीती विनयावरती ?
का हसता मज ? मी अधिर नसे एकटी
गतिमान कालही थांबे श्रवणाकरिता ॥४॥

शब्द शब्द अपुला टिपुन मनानें घेतें
कल्पनेत अपुलें शौर्य पुन्हा पाहते
विसरतें मला मी, त्यातच विरुनी जातें
ही घडि, हे क्षण, मी जगतें याच्याकरिता ॥४॥

पांडव वनवासी झाले परंतु तेवढ्यानेंही दुर्योधनाचें पुरतें समाधान झालें नाही. हालआपेष्टांत दिवस काढणाऱ्या पांडवाकडे जाऊन आपल्या राजवैभवाचें प्रदर्शन करावें आणि त्यांना दिपवावे असें त्याने ठरवले. त्यासाठीं आपल्या कोषागारातील सर्व रत्नें आणि आभरणें त्यानें सर्व कुलस्त्रियांना परिधान करावयास दिली, त्यांना बरोबर घेऊन तो ससैन्य पांडवांकडे जाण्यास निघाला.

वाटेत त्याच्या दुर्दैवाने त्याचा व चित्रसेन गंधर्वाचा कलह झाला आणि त्याचें पर्यवसान युद्धांत झालें. संतप्त झालेल्या चित्रसेनाने सर्व कौरव सैन्याचा पराभव केला, कर्णही त्याच्यापुढे निष्प्रभ ठरला आणि रणांगणांतून पळून गेला. दुर्योधन व त्याच्या राजस्त्रियाही बंदिवान झाल्या.

नाइलाज म्हणून दुर्योधनाचे अनुचर पांडवांकडे गेले त्यांनीं दुर्योधनाच्या पराभवाचें वृत्त पांडवांच्या कानावर घातले. तें ऐकल्यावर भीमाला अत्यानंद झाला. तो म्हणाला, " वा ! चित्रसेनानें दुर्योधनाला परस्पर चांगलेंच शासन केलें. त्याच्या सारख्याला हेंच शासन योग्य आहे."

हें ऐकून धर्माला मात्र दुःख झालें. तो म्हणाला,

# युधिष्ठिर :

जिंकिले दुर्योधनाला यांत भीमा हर्ष कसला ?
शस्त्र घे रे प्रथम हातीं मुक्त करि जा कौरवाला ॥ धृ. ॥

जाणतों मी यातना ज्या जाळती तुज भीमसेना
तव मुखानें प्रकट होती पांडवांच्या वेदना या
धाडुनी आम्हा वनीही तृप्ति ना दुर्योधनाला
राजवैभव दाखवोनी वनि अम्हा ये हिणविण्याला
दुष्टबुद्धि पात्र जरि हा अधिक याहुन शासनाला ॥१॥

वैरभावाविण मनीं ना अन्य याच्या भाव कांहीं
जाणतों मी मृत्युविण ना, शांतविल हें वैर कुणिही
बंधु अमुचा तरिहि हा रे, सुजन वा दुर्जन कसांही
बांधते याच्यासवे मज, तुजसिही कर्तव्य कांहीं
स्मरुनि त्या कर्तव्यधर्मा, बांध घाली भावनेला ॥२॥

वैरभावानें कलंकित एक कां, हे कुल कुरूचें ?
कलह, स्पर्धा यांतुनी ना, मुक्त भीमा कुल कुणाचे !
भेद सारे वरिवरीचे आतुनी परि जीवनांना
रक्तधागा एकसूत्री गुंफितो कुलबांधवांना
ओढ त्याची ही अनावर तोडवेना जाणत्याला ॥३॥

युद्ध होता भीमसेना कौरवांचे पांडवांचें
शत्रु कौरव वधुन त्यांना, जिंकणें कर्तव्य अमुचें
वैर हेप परि आमुच्यातिल, लाभ त्याचा घ्यावयाला
येइ हे परचक्र, करिसी काय त्याच्या स्वागताला ?
कौरवा चल ऊठ जाई कौरवांच्या रक्षणाला ॥४॥

नेतसे गंधर्व हा जो जिकुनी दुर्योधनाला
मित्र तो हो शत्रु अमुचा जिकतां कुलबांधवाला
कौरवेशा बद्ध करुनी हासतो तो कौरवांला
हासतो कुरुवंशजांच्या, माझिया तव पौरुषाला
कुरुकुलाचे घेऊनी यश, चालला तो रोधि त्याला ।।५।।

आजवरती ठाऊका ना, स्पर्श वाऱ्याचा जयांना
देवताहुन पूज्य अमुच्या कौरवांच्या त्या स्त्रियांना
आज नेती हरण करुनीं हात परक्या मानवाचे
काय त्यांच्या रक्षणाहुनि अधिक भीमा वैर अमुचें ?
आर्त त्यांचीं हांक जाते भिडुनि माझ्या काळजाला ।।६।।

पांडवांच्या अज्ञातवासांतही कौरवांनीं त्यांची पाठ सोडली नाही. पांडव विराटकडे असावेत अशी कुणकुण लागताच कौरवांनीं विराटावर स्वारी केली व त्याच्या गाई पळवल्या.

कौरवसैन्याचा प्रतिकार करण्यासाठी विराटपुत्र उत्तर निघाला. त्याला सारथी मिळेना. म्हणून तें काम बृहन्नडेच्या वेषांत वावरणाऱ्या अर्जुनाने स्वीकरलें. उत्तर व अर्जुन युद्धभूमीपाशी आले. भीष्म, द्रोण, कर्ण आदि महारथ्यांनी युक्त असलेली ती कौरवसेना पहाताच उत्तराचें उसने अवसान पार गळून गेलें. तो युद्ध टाकून पळून जाऊ लागला. अर्जुनाने त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, दरडावून सांगितले. पण भयभीत झालेल्या उत्तरानें युद्ध करण्याचे साफ नाकारले. सरतेशेवटी अर्जुनाने त्याला आपलें सारथ्य करण्यास सांगितले. व स्वसः युद्ध करण्याचे ठरविले त्यानंतर स्वतःचीं दिव्य शस्त्रे घेण्यासाठी त्याने आपला रथ शमीवृक्षाजवळ नेला.

तो शमीवृक्ष, त्याच्या ढोलीतील आपली ती दिव्य शस्त्रे आणि समोर कौरवांचा सेनासागर पाहाताच अर्जुनाला स्फुरण चढले. त्याच्या हातातील बाहुबंध तुटून पडले आणि त्याच्या अंगात वीरश्रीचा संचार झाला. हा अनुभव अपूर्व होता. त्याचक्षणी आतून खोलवरून कुठेंतरी एक भंभोर पण पौरुषयुक्त आवाज अर्जुनाला सांगू लागला.

सरले दिन तव अपमानाचे
सरे दास्य अंधार
पुन्हां होइ तव बाहूमध्ये वीरश्री संचार
होइ तुज पौरुषसाक्षात्कार
अर्जुना पौरुषसाक्षात्कार ।। ध्रु. ।।

शमीवृक्ष तो हाच जिथें तें
दिव्य धनू तव निद्रा घेतें
प्रत्यंचा त्या जोडुनि करि तूं
भयकारी टंकार ।। १ ।।

शापबलें जीं विस्मृत झालीं
अस्त्रें तीं ही जागुनि उठलीं
स्फुरति मानसीं मंत्र तयांचे
करि केवळ उच्चार ।। २ ।।

दु:स्थितिला जें तुमच्या कारण
पुढें ठाकलें तें कौरवगण
तीक्ष्ण शरांसह वर्षी त्यावर
क्रोधाचा अंगार ।। ३ ।।

अटळ युद्ध जें उद्या व्हायचें
प्रतिबिंबच हें आज तयाचें
प्रगटूं दे तव कणाकणांतुन
जिंकिन हा निर्धार ।। ४ ।।

भीष्मद्रोणकर्णांतच या रे
एकवटे कौरवबल सारे
नव्या लाभल्या दिव्यास्त्रांचा
करि त्यांवर भडिमार ॥ ५ ॥

देवगणांची झाली दाटी
युद्ध तुझें हें बघण्यासाठीं
ओठांतुनि तूं त्यांच्या उठवी
तुझाच जयजयकार ॥ ६ ॥

वनवास आणि आज्ञातवास संपवून पांडव परत आले. 'द्यूतांत' ठरल्याप्रमाणे आपलें राज्य आता आपल्याला परत द्यावे अशी युधिष्ठिराने धृतराष्ट्राकडे मागणी केली. ती दुर्योधनाने धुडकावून लावली. यावेळी दुर्योधनाला समजावून सांगून त्याचे मन वळवणे हे वास्तविक धृतराष्ट्राचे कर्तव्य होते. पण त्याने उलट धर्मराजाचीच समजूत काढण्यासाठी आपला संजय नावाचा दूत त्याच्याकडे निरोप देऊन पाठवला की "धर्मा तुझी मागणी न्याय्य आहे परंतु हट्टी दुर्योधन माझे ऐकत नाही. हट्टाचें पर्यवसान युद्धांत होणार हे दिसते आहे. पण असे युद्ध घडले तर त्याने संपूर्ण कुरूकुलाचा नाश होईल. तो टाळण्याचा प्रयत्न तो करणार नसला तरी तुझ्यासारख्या धर्मज्ञ माणसाने केला पाहिजे. यः कश्चित् राज्यासाठी जर तुझ्यासारख्या धर्मज्ञाने रक्ताचे पाट वाहविले तर तुझ्या आजवरच्या यशाला कलंक लागेल. दुर्योधन कसाहि वागेल. परंतु तू ... तू तरी आपले शांतिव्रत सोडू नकोस" या निरोपामागचा अर्थ आणि त्याचबरोबर धृतराष्ट्राचा कावेबाजपणा युधिष्ठिराच्या ध्यानांत आला. तो कृष्णाला म्हणाला,

## युधिष्ठिर :

युद्धसज्ज मी वाटें, परिही समेट होउनि युद्ध टळावें
मनोमनीं या अर्जुनी कृष्णा सुयोधनाशीं सख्य घडावें ॥ धृ. ॥

ऐकलेस तूं संजयभाषित
दूतमुखें या हो प्रतिबिंबित
धृतराष्ट्राचें स्पष्ट मनोगत
धर्मवृत्तिचे माझ्या गावो कितिही तो गोडवे ॥ १ ॥

वनीं आणि अज्ञाती राहुन
वचनाचें अम्हीं केलें पालन
पुत्रलोभि हा स्वधर्म विसरुन
सुयोधनाला आड करुनिया मांड कपट नवें ॥ २ ॥

अंश न देता राज्यामधला
शांति हवी या धृतराष्ट्राला
अर्थ दिसे नच काय यांतला ?
न्याय्य लाभण्या अटळ ठरे हें युद्ध कुरूंच्या सवे ॥ ३ ॥

युद्धाच्या परि संकल्पानें
ऊर भरे हें विषण्णतेनें
काय लाभ या संहारानें ?
मानव जीवित मानवेच कां इतुके तुच्छ गणावे ? ॥ ४ ॥

युद्धि विजयि कुणि, कुणी पराजित
लाभुनि विजयहि शांति न शाश्वत
वैर न विझते, राही धुमसत
समय पाहुनी उठ पेटवित नांव, वंश, गांवे ॥ ५ ॥

मार्ग जयाचा रक्तें रंजित
मृतसुहृदांना जाई तुडवित
वैभव लाभे तेहि कलंकित
हतपुत्रांस्तव ढाळी जेता सिंहासनिं आसवें ॥ ६ ॥

लव स्वार्थास्तव करण्या संगर
हिंस्त्र पशू कां मनुष्य वनचर ?
अंशरूप तर तो परमेश्वर
अवमानित का अश्या कृतीनें ईशालाच करावे ? ॥ ७ ॥

मना अजुनही वेडी आशा
शक्य टाळणें तुला विनाशा
अन्त्य यत्न करि तूं जगदीशा
शिष्टाईनें तुझ्या तरी हे कौरववैर मिटावें ॥ ८ ॥

धर्मानें आपल्या अंत:करणांतील व्यथा कृष्णाजवळ बोलून दाखविली. त्याचें हें भाषण ऐकून भीमअर्जुन दोघेही प्रभावित झाले. आणि समेट करण्याच्या धर्माच्या विचारालाच त्यांनी संमती दिली. स्वत: कृष्णही म्हणाले, "धर्मा, समेटाच्या प्रयत्नांतून कांहीं साधेल असें मला वाटत नाही. परंतु राजनीतीचा एक भाग म्हणून समेटाचा हा प्रयत्न मी अवश्य करीन."

जवळच द्रौपदी, पांडवांचा आणि कृष्णाचा हा संवाद जीवाचे कान करून ऐकत उभी होती. कौरव पांडव यांचे युद्ध होईल आणि त्यांत आपल्या अपमानाचा सूड–प्रतिशोध–घेतला जाईल या एकाच आशेवर तिने वनवासांतील बारा वर्षें व अज्ञातवासांतील एक अशी तेरा वर्षँ काढली होती परंतु आज...आज काय घडत होते ? तिच्या अपमानाचा साधा उल्लेखही न करिता ही राजकारणी मंडळी समेट करावयास निघाली होती. हें पाहून तिला अपार दु:ख झाले. दु:शासनानें सभेंत ओढलेला आपला केशपाश तिने मोकळा सोडला, हातावर घेतला आणि रुद्ध कंठानें तिनें हांक दिली "कृष्णा..." तिचे डोळे अश्रूंनी भरुन आले होते. ओठ थरथरत होते. मोठ्या कष्टानें शब्द जमा करून ती त्याला म्हणाली."

## द्रौपदी :

राजनीति जाणतोस कृष्णा, जा शिष्टाई करण्याला
हृदयव्यथा परि तुझ्या भगिनिची, घ्यानि असूं दे गोपाला ।। ध्रु. ।।

स्वयंवरांतिल पराक्रमाला
भुलुनि अर्पिली ज्या वरमाला
पार्थ तोहि निजतेज विसरला
मूक गिळे कां अपमानाला, ।। १ ।।

समर्थ ज्याच्या बाहूवरती
विसंबले मी वनि अज्ञाती
भीमासहि त्या रुचते शांती
अग्निच विसरे दाहकतेला, ।। २ ।।

भगिनी कृष्णा तुझी अभागिनि
पराक्रमी पति पांच असोनी
काय लाभले तिला जीवनीं ?
अपमानांची अखण्ड माला, ।। ३ ।।

एकवस्त्र मज सभेंत नेले
'जिता' म्हणुनि मज कौरव हंसले
संमुख पति परि जीवन असलें !
दुजा कुणाच्या ये वाट्याला ? ।। ४ ।।

तेरा वर्षे हृदयि धरोनी
प्रतिशोधाचा प्रदीप्त वन्ही
जगेल कां कुणि सांग मानिनी
संमति देण्या शांतिजपाला ? । ५ ।।

खुशाल करुं दे समेट पांडव
वध्याचि मजला आतां कौरव
पाही येइल निज कन्येस्तव
वृद्ध पिताही युद्ध कराया, ॥ ६ ॥

मरूं मारुं वा या आवेशें
लढांतल माझे कुमार त्वेषें
रक्त सांडतां कुरुपुत्रांचे
घडे सांगता संकल्पाला, ॥ ७ ॥

सांगायाचे सरले सारें
युद्ध, युद्ध, मज युद्ध हवे रें
आणु नको, मनिं विचार दुसरे
विसरुं नको या कचपाशाला, ॥ ८ ॥

काळाचीं पावले ओळखणाऱ्या कृष्णानें द्रौपदीला धीर दिला. आणि सांगितलें, " द्रौपदी, शोक आवर तुला पाहिजे तें घडून येईल; लौकरच या कौरवांचा नि:पात झालेला तूं आपल्या डोळयांनीं पाहशील. '

पांडवांचा निरोप घेऊन कृष्ण निघाले. वाटेत पौरजनांनी त्यांचें अपूर्व स्वागत केले. ही वार्ता धृतराष्टाचा कानावर गेली.

कृष्ण हाच पांडवांचें खरें सामर्थ्य आहे हें धृतराष्ट जाणून होता. त्याच्या मनांत एक कल्पना चमकून गेली. त्यानें भीष्म, विदुर, दुर्योधन यांना बोलाविले आणि सांगितले, " द्वारकाधीश कृष्ण समेटासाठीं येत आहेत. त्यांचें आपण भव्य स्वागत करूं या. "

धृतराष्ट्र :

युगपुरुषाचे चरण लागती या परते तें भाग्य कोणतें ?
सम्राटाला उचित करावें स्वागत कृष्णाचें ।। ध्रु० ।।

सोळा सजवा सुवर्णरथ, त्या जोडा अश्वा सुलक्षणी
अष्ट गजेंद्रा करा अलंकृत सुवर्णवरती मढवोनी
नव्हे भेट ही चिन्ह आमुच्या हे सद्भावांचें ।। १ ।।

अनाघ्रात रतिसमान सुंदर कुसुमकोमला शतदासी
अहर्निशी या मदनसुंदरा रिझवुनि करु द्या सेवेसी
दासीपद ही या कृष्णाचे सम्राज्ञीहुन भाग्याचे ।। २ ।।

रूपे ज्यांच्या अवतरलसे मूर्तिमंत शृंगार
सहस्त्र असल्या गणिकांचा त्या देइन श्री प्रतिहार
पुरुषोत्तम हा अल्पस्वल्प जे माझे ते याचे ।। ३ ।।

पथापथावरि नगर–कन्यका सिद्ध स्वागता राहूं द्या
सुहास्य मुद्रा दिसण्या त्यांच्या अवगुंठन ही नको तया
अनिमिष नेत्री त्याहि पिऊं दे रूप मुकुंदाचे ।। ४ ।।

दृष्टि तयाची पडे जयावर, मना रुचे वा ज त्याच्या
प्रवाळ, मौक्तिक, हिरे माणके, ओतिन राशी रत्नांच्या
कल्पतरूला तुलसिपत्र हें माझ्या पूजे चें ।। ५ ।।

अपूर्व होइल उद्या सोहळा जनार्दनाच्या भेटीचा
पुत्रपौत्र हे माझें बघतिल दिवस उद्याचा सोन्याचा
श्रवणानें मज अंधा लाभो सौख्य दर्शनाचे ।। ६ ।।

श्रीकृष्णाला पांडवांमधून फोडतां यावें या एकाच हेतूनें धृतराष्ट्रानें स्वागताची तयारी चालवली होती. परंतु...

कृष्ण हस्तिनापुराला आले. पण ते धृतराष्ट्राकडे न उतरतां उतरले विदुराकडे. पांडवाची माता कुंती ही पांडव वनवासात असल्यापासून विदुराकडेच रहात होती. तिची त्यांनी भेट घेतली. त्यानंतर रात्रभर विदुराशी त्यांचीं बोलणी झालीं. धृतराष्ट्राच्या नेमके काय मनात आहे याची विदुरानें त्यांना पूर्ण कल्पना दिली.

दुसऱ्या दिवशी सकाळीं सकाळीं मंगलस्नान करून कृष्ण राजसभेंत गेले. धृतराष्ट्र व दुर्योधनाने त्यांचे स्वागत केले. कृष्णांनीही भीष्मादि वडिलधाऱ्या मंडळींना वंदन केले. सभासद स्थानापन्न झाले. कृष्ण उठून उभे राहिले. आणि आपल्या मधुर परंतु स्पष्ट वाणींत ते धृतराष्ट्राला सांगू लागले,

**श्रीकृष्ण :**

पांडवांस तूं स्थानि पित्याच्या
धर्म सांगतो तुज प्रणिपाता
समेटार्थ मी आलों राजा
तुझ्याच पुत्रांच्या ।। ६६० ।।

दिल्या वचाचे करुनी पालन
पार्थ प्रगटले अज्ञातांतुन
उरें वचाचे तव प्रतिपालन
हितार्थ उभयांच्या ।। १ ।।

निधन पित्याचें घडता यांवर
मायेची तूं धरली पांखर
कृतज्ञ यास्तव अर्जुनि युधिष्ठिर
स्नेह मनीं त्याच्या ।। २ ।।

लाक्षागृहिं तुम्हि त्यांस जाळिले
राज्य पंडुचे द्विखंड केले
मळभ मनावरि परी न आले
अजातशत्रूच्या ।। ३ ।।

हा धर्मात्मा, याच्या हृदयीं
प्रेमाविण ना दिसेल कांहीं
कटुस्मृतीची खूण पुसट ही
अंतरिं ना याच्या ।। ४ ।।

युधिष्ठिराशी सख्य जोडतां
होशि पांडवा तूंच नियंता
चिरंजीव हो पुत्रीच ससा
पाया प्रेम जिचा ॥५॥

परस्परांना वधण्याकरितां
कौरव पांडव दोघे लढतां
गौरव राजा तुझा कोणता
अथवा भरतांचा ॥६॥

वैर काय या कुरुकुलाचें
कुलनाशानें संपायाचें ?
शेष न ठेवति कुल क्षेत्राचे
ज्वाला युद्धाच्या ॥७॥

पुत्रमोह कां कौरवकुलहित
धृतराष्ट्रा घे निर्णय निश्चित
युध्द शांति ही दोन ही अंकित
तुझ्याच शब्दांच्या ॥८॥

पितृस्नेह तू जरी वर्षसी
सिध्द पार्थ हे तव सेवेसी
सिध्द अन्यथा तुज युध्दासीं
चुकता कर्तव्या ॥९॥

श्रीकृष्णांनीं मनापासून केलेल्या समेटाच्या प्रयत्नाला दुर्योधनाकडून कोणताच प्रतिसाद मिळाला नाही. उलट त्यानें श्रीकृष्णांना स्पष्ट सांगितले, " पांच गावेंच काय परंतु सुईच्या अग्रावर राहील एवढी जमीनही पांडवाना मी देणार नाही. पांडवांना राज्यच हवें असेल तर त्यांना माझ्या प्रेतावरून चालत जाऊन तें मिळवावें लागेल." ही बोलणी चालू असतांनाच दुर्योधनानें पूर्वी ठरल्या प्रमाणें कौरवांच्या पडद्यामागील हालचाली सुरू झाल्या. पांडवांचें सामर्थ्य असें समजल्या जाणाऱ्या श्रीकृष्णालाच बंदिवान करून कारावासात टाकावयाचें असा व्यूह त्याने आखला होता. त्याची कारवाई सुरू झाली.

पण सभेत असे कांहीं घडेल हें श्रीकृष्ण पूर्ण जाणून होते. इतकेच नव्हे तर दुर्योधनाच्या व्यूहाला प्रतिव्यूह रचून मगच त्यांनीं कौरवसभेंत पाऊल टाकलें होतें. त्यांनीं स्वतःबरोबर सात्यकी व कृतवर्मा या यादव वीरांनाही सभेत आणले होते. कौरवांच्या सर्व हालचाली सात्यकी बारकाईनें पहात होता. त्याला संशय येतांच त्यानें श्रीकृष्णांना खूण केली. श्रीकृष्णांनींही दुर्योधनाचें तें आव्हान स्वीकारण्याचा निश्चय केला. क्षणांत शांतिदूत श्रीकृष्णांनीं आपलें रौद्र रुप प्रकट केलें. ते ताडकन उठून उभे राहिले. आणि दुर्योधनाला म्हणाले—

**श्रीकृष्ण :**

कपटहेतु काय तुझा मीहि जाणतों
बंदिवान पाहु कुणा कोण करिल तो ॥ ध्रु ॥

असताही दूत मजसि
बंदिवान करूं धजसि
राजधर्म काय तुझा हेंच सांगतो ? ॥ १ ॥

निर्बल मज समजलास
म्हणुनि करिसि साहसास
भ्रमनिरास मीहि तुझा करुनि टाकतों ॥ २ ॥

आणियले कां सभेस
कृतवर्मा सात्यकीस ?
संरक्षण साधे कां कृष्ण विसरतो ? ॥ ३ ॥

नगरीं तव पाठविली
यदुसेना कां अपुली
योजिल्याविना न तू पाऊलहि उचलतो ॥ ४ ॥

थांबसि कां करि प्रहार
शलभापरि तव विचार
दावाग्नी गिळण्याला तोहि धावतो ॥ ५ ॥

पांचजन्य फुंकुनिया
निमंत्रितों यदुसैन्या
कौरव हें नांवहीं न आज ठेवतों ॥ ६ ॥

धर्म खरा भाग्यवान
जय त्याला युद्धाविण
सिंहासनिं मी तुझ्याहि त्यास बसवितों ॥ ७ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
68664 07105
2002 98131 07
दा. क्र. 92208

श्रीकृष्णाचें तें रुद्रस्वरूप पहाताच त्यांना बंदिवान करण्याचें धाडस दुर्योधनानें केले नाहीं.

शिष्टाई असफल झाली हें वृत्त विदुराच्या घरीं जाऊन श्रीकृष्णांनी राजमाता कुंतीच्या कानावर घातले.

पांडवांच्या सर्वच वर्तनावर कुंतीचें फार बारकाईनें लक्ष होते. दुर्योधनानें श्रीकृष्णांच्या शिष्टाईची केलेली संभावना ऐकल्यावर तिच्यातली क्षत्रस्त्री जागी झाली. ती कृष्णाला म्हणाली, " कृष्णा, माझा ज्येष्ट पुत्र जो धर्म आहे त्याला म्हणावें" धर्मा,

## कुंती :

प्रसव वेदना साहुनि ज्या स्तव
क्षत्र स्त्री दे जन्म सुताला
धर्मा युद्धकाल पातला ॥ ध्रु ॥

धर्म धर्म नव घोष चालला
तुझ्याच कृतिनें धर्म लोपला
शब्दपण्डिता, नाकळले तूं धर्म रहस्याला ॥१॥

क्षत्र कुळीं तूं जन्मा आला
क्षात्रधर्म तूं पाळ आपुला
भयापासुनी पराक्रमानें रक्षी जो सकला ॥ २ ॥

बाहूपासुनि प्रजापतीच्या
जन्म जाहला क्षत्रियाचा
बाहुबलानें यास्तव जीवन धर्मविहित त्याला ॥३॥

क्रूरकर्म तो शत्रु वधाचें
आचारिता करि मन वज्राचे
प्रजापाल नी प्रेम तयाचें लाजवि मातेला॥ ४ ॥

निकषावर या घेइ पारखुन
दयार्द्र मन तव, दुबळें वर्तन
धर्म भ्रष्टा, जोडिसि यानें कुठल्या पुण्याला ? ॥५॥

तुझ्या सारख्या पुत्रा प्रसवुन
परान्न जेव्हां मी करि सेवन
स्मरते तुज मी घासासंगे गिळते अपमाना ॥ ६ ॥

द्यूतामध्येंनि तुम्हां नागवु
वनीं धाडिले कुरुपुत्रांनीं
दुःखें हीं मी सहज पचविलीं, एक न पचलें मला ॥७॥

घाव सांगते मर्मावरला
डिवचुन तुमच्या पुरुषार्थाला
स्नुषेस माझ्या दुर्वचनें जीं दुःशासन बोलला ॥ ८ ॥

अपमानाच्या त्या शब्दांनीं
शवेंहि उठतिल स्मशानांतुनी
पुरुष व्याघ्र तुम्हि, तुम्ही कापवा स्वर्भूपृथ्वीला ॥ ९ ॥

तेज-हीन अग्नीपरि घुमसत
कशास जगतां वर्षे शतशत ?
तडितेपरि जा क्षणांत जळुनी, जाळित शत्रूला ॥१०॥

'धर्मा युद्धकाल पातला' असा संदेश कुंतीनें धर्माला पाठविला आणि त्यानंतर ?... त्यानंतर तिच्या डोळ्यासमोर उभें राहिलें युद्ध ! त्या युद्धातील कौरववीर एकेक तिच्या डोळ्यासमोरून सरकूं लागले. भीष्म द्रोण, कर्ण...आणि ती एकदम थबकली. कारण भीष्म--द्रोण पराक्रमी होते परंतु त्यांचें पांडवांवर प्रेम होतें. पण कर्ण ? तो मात्र पांडवांच्या द्वेषानें जळत होता. आणि त्याही पेक्षां महत्वाची गोष्ट म्हणजे, कर्णाला ठाऊक नसलें तरी तिला माहीत होतें कीं कर्ण हा तिचाच पुत्र होता.

आपलें नातें जर कर्णाला आपण सांगितलें तर तो येईल कां पांडवांच्या पक्षांत ? एक वेडी आशा तिच्या अंतःकरणांत डोकावून गेली. त्यासाठीं समाजाच्या भीतीनें जें आजवर अंतःकरणांत दडपून ठेवलें तें...तें कर्णाचें जन्मरहस्य तिनें त्याच्यासमोर उघड करावयाचे ठरविलें.

प्रभातकाळची वेळ. सूर्याला अर्घ्य देऊन कर्णानें डोळे उघडले तो त्याला समोर दिसली कुंती. ! "राजमाते कुंती, राधेयाच्या प्रणामाचा स्वीकार कर." कर्ण सहजपणानें म्हणाला. पण तो घाव कुंतीच्या जिव्हारी बसला. 'कर्णा, तू राधेय नाहीस, तूं माझा मुलगा आहेस. तूं कौंतेय आहेस.' ती म्हणाली आणि त्यानंतर कुंतीनें आपलें अंतःकरण कर्णापाशी मोकळें केलें. आणि त्याला सांगितले, "कर्णा, तुझ्या हातून तुझ्याच भावांचा वध होऊं नये म्हणून मी आलें. पांडवांना तुझ्यापासून अभय असावं. तुझ्या आईसाठीं तरी एवढे कर." 'आई' हा शब्द तिच्या तोंडून निघतांच कर्ण विषण्ण झाला. आणि तो तिला म्हणाला,

**कर्ण :**

अपराधाचे तुझ्या भोगतों शासन मी प्रत्यही
जन्मदात्रि तूं केवळ माझी, नव्हेस तूं आई ।। ध्रु० ।।

आज सांगसी रहस्य मजला माझ्या जन्माचें
घडून गेलें घडावयाचें, टळे न जेव्हा युद्ध उद्याचें
अपमानाचें हालाहलही प्राशुनि जगलों मी म्हणुनी
बंधुवधाच्या अनुतापाची लावाया आलीस टोंचणी ?
जन्म-वैरि तरि याहुन चिंती मनीं अन्य कांहीं ? ।। १ ।।

उरी उमाळा नसे आजही नच प्रेमाचे भरते
पांडव–हित–रक्षणार्थ केवळ हृदय तुझें जळतें
मला सांगसी बंधुवधा तूं नको होउं कारण
सांगितले कां धनंजया तूं बंधु तुझा कर्ण ?
दुजा भाव हा मना आइच्या स्पर्शे ना स्वप्निही ।। २ ।।

"सूतपूत्र हा" म्हणुनी झाला शौर्याचा धिःकार
"सूतपूत्र हा" स्वयंवरातहि पुन्हा बसे तो वार
अपमानांनीं अशा पेटला–हृदयी जो अंगार
विझे काय तो क्षत्रकुलांचा केल्याविण संहार ?
पुत्र झुंजविशि पुत्रासंगे ही तव पुण्याई ।। ३ ।।

तुला तरी मी कुंती देऊं कशास हें दूषण ?
दुर्दैवानें शापित अवघें कर्णाचें जीवन
अभय मागशी, अभय दिलें जा चार पांडवांना
अखेरच्या परि निर्धारानें भिडेन मी अर्जुना
पांच राहतिल पार्थ शेवटीं युद्धांतीही ।। ४ ।।

युध्दाचा पहिला दिवस उजाडला. कौरव पांडव सैन्यें समोरासमोर उभीं राहिलीं. अर्जुनाच्या इच्छेवरुन श्रीकृष्णांनीं त्याचा रथ कौरवसैन्या समोर उभा केला. अर्जुनानें कौरव सैन्यावर दृष्टीटाकली. तो त्याचे पितामह भीष्म, गुरु द्रोण, कृप, गुरुबंधु अश्वत्थामा आणि स्वत:चेच असंख्य नातेवाईक त्याच्या दृष्टीला पडले.

एकाएकी त्याचा घसा कोरडा पडला, त्याच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. तो श्रीकृष्णाला म्हणाला, " कृष्णा, या गुरुजनांचा, या बांधवांचा संहार मी करावयाचा ?... कशासाठी ? क्षुद्र राज्यासाठीं ? त्यापेक्षां अरण्यांत जाऊन भीक मागून जगलेलें काय वाईट ?" एक अपराधीपणाची भावना त्याच्या अंत:करणाला व्यापून राहिली. त्याच्या हातातलें धनुष्य गळून पडलें. त्याच्या अंगाला कापरें भरलें. न्यायरक्षणासाठीं युध्दाला निघालेल्या अर्जुनाला झालेला तो मोह पाहून श्रीकृष्ण म्हणाले,

**श्रीकृष्ण :**

रुद्ध कां कंठ तव ? अश्रु नेत्रात कां ?
म्लान मुद्रा कशा ? कंप शरिरा ?
सोड षंढत्व हें उचल गांडीव तें
उठ युध्दार्थ तूं पांडवेन्द्रा ।। ध्रु ।।

'बंधु गुरु या वधूं क्षुद्र राज्यार्थ मी ?
मागतों याहुनी भीक वनिं जाउनी'
म्हणसि कां तूंच हें ? मळभ कां ये मना ?
झाकते आज कां तम महाभास्करा ? ।। १ ।।

कोण शत्रू तुझा कोण वा बंधुही
काय विसरे तुझी बुद्धि हे भेद ही ?
स्वजन ते बंधु ते धर्म जे रक्षिती
याविना आप्त ना धर्मवीरा ।। २ ।।

स्वकर्मा होइ कां क्षत्र कुणि पारखा ?
श्रेयदायी तुला याहुनी अन्य कां ?
लाभलें युद्ध हें स्वर्ग सोपान हा
धर्म हा, मुक्ति ही हीच क्षत्रा ।।

युद्ध तूं सोडता काय लाभे तुला ?
शत्रु तव निंदतिल भ्याड म्हणुनी तुला
कां यशोधन जगें ऐकज्या कीर्ति ही ?
वरिल तो याहुनी मरणनिद्रा ।।

जिंकला युद्ध हें होसि सम्राट तूं
मृत्यु येतां रणीं पावसी मुक्ति तूं
म्हणुनि करि निश्चया, ऊठ शत्रुं जया
शत्रुरक्तें तुझ्या आज भिजवी धरा ।।

कौरव–पांडवांचें युध्द सुरु झालें युध्दाच्या पहिल्याच दिवशीं कौरवांचे सेनापती पितामह भीष्म यांनीं अतुल पराक्रम केला. एवढा दिव्यास्त्रवेत्ता अर्जुन पण तोही त्यांच्यापुढे निष्प्रभ ठरला. पांडव सैन्यांना पळतां भुई थोडी झाली.

मूळचाच मृदु स्वभावाचा युधिष्ठिर ; तो तर या प्रथम दिवशीच्या पराभवानें खचून गेला, तो कृष्णाला म्हणाला,

## युधिष्ठिर :

नको युद्ध हें, नको राज्य हा, घेतों मी माघार
यदुवरा थांबवि हा संहार ॥ धृ० ॥

शौर्य पाहुनी पितामहांचें
स्वप्न विरे मम कुरुविजयाचें
अनुतापाची घडी आज ये, दाटे मनिं अंधार ॥१॥

भीष्म नव्हे हा, हा प्रलयाग्नी
रसरसलेल्या शरज्वालांनीं
जीर्णतृणासम पांडव सैन्ये करितो स्वाहाकार ॥२॥

कुणी रोधि कां ऋद्धयमाला ?
वज्रधारि वा देवेन्द्राला ?
अप्रतिहत हा तसा संचरे अजेय वृध्दकुमार ॥३॥

भीष्मा जिंकिन करुनी निश्चय
सौम्य युध्द परि करी धनंजय
दिव्यास्त्रें कां याचीं झालीं आज स्मृतीच्या पार ? ॥४॥

धनुष्य जोवरि भीष्माहातीं
अशक्य आम्हा विजयप्राप्ती
क्रमाक्रमानें सुहृद अम्हाला केवळ अंतरणार ॥५॥

भ्याड म्हणूं दे कुणी मजप्रती
युध्द नव्हे हें, ही प्राणाहुति
माझ्यासाठीं काय घडावा असला हिंसाचार ? ॥६॥

घडो पुन्हा ना पाप हातुनी
दृष्टी लाभे नवी जीवनीं
तप:साधना ध्येय यापुढें हाच उचित निर्धार
यदुवरा थांबवि हा संहार ॥७॥

पहिल्या दिवसाच्या पराभवानें खचलेल्या युधिष्ठिराला स्वत: श्रीकृष्णांनीं धीर दिला. ते म्हणाला, " धर्मा, तूं धीर सोडूं नकोस. प्रसंगीं मी माझी प्रतिज्ञा मोडूनही तुझ्यासाठीं युध्द जिंकून देईन. "

तो प्रसंग श्रीकृष्णावर लौकरच आला. युध्दाचा नववा दिवस उजाडला. कृष्णभक्त भीष्मांनीं प्रतिज्ञा केली, " आज माझ्या पराक्रमानें मी स्वत: कृष्णाला हातांत शस्त्र धरावयास लावीन. " त्या दिवशी भीष्मांनीं अफाट पराक्रम केला. त्याच्या समोर युध्दाला उभा राहिलेल्या अर्जुनाला उसंत लाभेना. भीष्मांच्या शरवृष्टीमुळें त्याला वारंवार मूर्च्छा येऊ लागली. युध्द सुरु झाले कृष्णभक्त दोन तुल्यबल योद्ध्यांचे आणि दोन कृष्णभक्तांचेहि. श्रीकृष्ण संतापले. त्यांनीं रथाच्या खालीं उडी मारली आणि हातातला चाबूक घेऊन ते वेगानें भीष्मांवर चालून जाण्यास निघाले. रागानें त्यांचे डोळे लाल झाले होते. पायाखालची धरणी कांपत होती. ते त्यांचें रुद्र स्वरुप पाहिल्यावर ' भीष्म मेले, ठार झाले ' अशी एकच आरोळी कौरवसैन्यांत उडाली. पण स्वत: श्रीकृष्ण आपल्यावर चालून येत आहेत हें पाहिल्यावर भीष्मांची काय स्थिती झाली ? त्यांना कृतकृत्य झाल्यासारखें वाटलें. त्यांनीं आपल्या हातांतील शस्त्रें खालीं ठेवलीं आणि सद्गदित स्वरांत ते कृष्णाला म्हणाले,

## भीष्म :

भक्तासाठीं वचन आपुलें, प्रभु तूं मोडियलें
युअच्युता, धन्य मजसि केलें ॥ ध्रु ॥

प्रसन्न हसऱ्या तुझ्या मुखावर
प्रगटविला मी क्रोध अनावर
भावविवश झाला योगेश्वर
भीष्म-शौर्य तूं अतुल ठरविलें ॥ १ ॥

कृतार्थतेचा हा मजला क्षण
वीरमरण ये प्रभुच्या हातुन
मुक्तीसाठीं अधीर जीवन
जन्म जन्मिचें संचित फळलें ॥ २ ॥

नको शस्त्र रे नको प्रहारहि
येइ माधवा ये लवलाही
उत्सुक त्यजण्या वृद्ध तनू ही
तव स्पर्शास्तव प्राण थांबले ॥ ३ ॥

येसि असा का मंदगतीनें ?
पळ पळ वाटे युगाप्रमाणे
येइ मुकुन्दा मनोजवानें
अधिर नेत्र हे अर्धे मिटले ॥ ४ ॥

काय अचानक प्रभू थांबला ?
असत्य कां हा भाव वाटला ?
मुकलों अखेर मी भाग्याला
गांगेयाचें पुण्यच सरलें ॥ ५ ॥

पाणावति कां तुझीं लोचनें ?
नको सांगु मज तूं शब्दानें
भक्त प्रभु कां दोन मनानें ?
अभिप्रेत तुज तें मज कळलें ।। ६ ।।

निरासक्त या जीवनांतले
कार्यभाग ना अजुन संपले
त्या कार्यास्तव झिजविन उरले
इच्छा मरणीं जीवन अपुलें ।। ७ ।।

वाटे तुज या वीर मृत्युहुन
कर्तव्याचें कृतार्थ जीवन
प्रभु चरणा तव कधीच वंदुन
जीवन मरणासहित अर्पिलें ।। ८ ।।

भीष्मपर्व संपलें. द्रोणपर्व सुरू झालें. त्यांत पांडवांना नामोहरम करण्याची एक कुशल योजना आखण्यांत आली: द्रोणांनीं चक्रव्यूह रचण्याचें ठरविलें. तथापि हा व्यूह भेदून जाण्याचें पूर्ण ज्ञान श्रीकृष्ण व अर्जुन या दोघांनाच होते. तेव्हां त्यांना कुरुक्षेत्रावरून प्रथम बाहेर काढावे असें ठरलें. त्यासाठीं संशप्तकांनीं अर्जुनाला युद्धासाठीं आव्हान दिलें, ते स्वीकारून अर्जुन व त्याचबरोबर श्रीकृष्ण हे कुरुक्षेत्र सोडून गेले.

चक्रव्यूह रचला गेला. एवढे पराक्रमी भीम, सात्यकी, धृष्टद्युम्न! परंतु चक्रव्यूह भेदून जाण्याचें ज्ञान त्यांच्यापैकी कोणालाच नव्हते. ज्ञानावाचून सर्व सामर्थ्य लटकें ठरलें. पांडवसैन्यांत निराशेचें वातावरण पसरलें. धर्माचा चेहरा काळजीनें काळवंडून गेला. "कोण भेदून जाणार हा चक्रव्यूह ? कौरवांचे आव्हान अनुत्तरित राहणार काय ?" आणि अशावेळीं अभिमन्यु पुढें आला. त्यानें ही कामगिरी स्वीकारली. त्यानंतर पुढे काय घडलें तें निवेदक सांगू लागला --

## निवेदक—

प्रिय पत्नीच्या सांगाती
चालून पाउलें सात
पाउल आठवे टाकी सौभद्र चक्रव्यूहांत ॥धृ.॥

आरूढ रथावरि होता
तो युवक युयुत्सु नेता
जयघोष तयाचा करितां
गलितधैर्य सैन्यामधला
जागून उठे पुरुषार्थ ॥ १ ॥

सोसाटत वीर सुटावा
लक्ष्यवेध करण्या जावा
त्यापरी निधुन तो छावा
कौरवांस जडान भिडला
शिरण्यास चक्रव्यूहांत ॥ २ ॥

गति त्याची रोखायाला
आवेशें चालुन आला
आडवा जयद्रथ त्याला
हो युद्ध घोर निकराचें
त्या दोघां वीरवरांत ॥ ३ ॥

अंति वज्रसारशरानें
जिंकिला जयद्रथ त्यानें
तो कौरव खचे मनानें
ना धजावला मग फिरुनी
अडविण्या तयाची वाट ॥ ४ ॥

सिंहनाद त्यावर करुनी
तो निघें पुढें सेनानी
येतसे सवें कां कोणी
पाहिले न वळुनी मागें
निःशंक शिरे व्यूहांत ।। ५ ।।

द्रोण कर्ण कृप तो आले
वेढिण्या तया शरजालें
तो तयास जाउनि भिडले
शर सौभद्राचे करण्या
आघाता प्रत्याघात ।। ६ ।।

मग सोडुनि तीक्ष्ण शरातें
नमविले तयें कर्णातें
विंधिले कृपः द्रोणातें
हो मूर्च्छित त्यांतिल कोणी
कुणि रणा दाविली पाठ ।। ७ ।।

मग एक बिचार करोनी
ते आले रणिं परतोनी
आवेशें पडति तुटोनी
त्या एक कुमारा बधण्या
शरवृष्टी करिती सात ।। ८ ।।

तोडिलें धनू कर्णानें
भंगिलें खड्ग द्रोणानें
तो खचे न लव परि त्यानें
झुंजण्यास त्याच्यासंगें
रथचक्र घेइ हातांत ॥ ९ ॥

झुंजतां अखेरिस सरले
बल त्याचें अपुरें पडलें
निष्प्राण शरिर कोसळलें
परि वळल्या होत्या मुष्टी
चावला तसा अधरोष्ठ ॥ १० ॥



संशप्तकांचा पराभव करून संध्याकाळीं अर्जुन परत आला. शिबिरांत सर्वत्र सचिंत वातावरण पसरलेलें त्याला दिसलें. कोणीही त्याच्याशीं बोलेना अखेर धर्मराजानें खाली मान घालून दिवसभरांत घडलेलें वृत्त त्याच्या कानावर घातलें. अर्जुनाला अपार शोक झाला. आपण युद्धभूमीवर नसल्या मुळेंच आपल्या पुत्राचा वध झाला असें त्याला वाटूं लागलें. सारखे एकच एक दृश्य त्याला डोळ्यासमोर दिसूं लागलें. चहूबाजूला कौरवसैन्य आहे. आपला पुत्र अभिमन्यु युद्ध करतो आहे. :एकटा ! अगदी एकटा. ! रक्तानें रंगलेल्या स्थितींत. आणि आपल्याला हांक मारतो आहे.

अर्जुनानें डोळे मिटले. पण तें दृश्य सरेना. अर्जुनाच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. धर्मानें, श्रीकृष्णांनी त्याचें सान्त्वन करण्याचा प्रयत्न केला. पण शब्दांनीं त्याचें समाधान होईना. तो रुद्ध कंठानें म्हणाला –

## अर्जुन :

व्याकुळल्या हृदयास नको या
शब्दांचा शिडकावा
मज अभिमन्यू भेटवा ॥ ध्रु. ॥

मदनासम ती कुमार मूर्ती
उभी अजूनहि डोळ्यांपुढती
आलिंगाया त्यास धांवती
बाहू हे माधवा ॥ १ ॥

मला प्रभाती करितां वंदन
सहज उमटले शब्द मुखांतुन
" जा वत्सा गाजव समरांगण
वाढवि कुलगौरवा " ॥ २ ॥

सत्य ठरविली माझी उक्ती
चिरंजीव तूं केलिस कीर्ती
वास्तव कां तूं दिलिस आहुती
दैव साधि दावा ॥ ३ ॥

इथें एकटा सोडुन तुजला
गेलों निघुनी कां युद्धाला
कृतिनें माझ्या मज अंतरला
माझा प्राण विसावा ॥ ४ ॥

पहा तिथें तो स्वर्गि थांबला
खुणवी तेथुन कुमार मजला
थांब कुमारा, पार्थ निघाला
जीव भेटुं दे शिवा ॥ ५ ॥

कृपण प्राण हे कां परि थांबती ?
प्रेम हेंच कां पुत्रावरती ?
कां कर्तव्यें मला घडविती
साक्षात्कार नवा ? ॥ ६ ॥

झुंजत रणि तूं देह ठेवला
शोक न शोभे तुझ्या पित्याला
तव मरणांतुन ये जन्माला
युद्धोत्साह नवा ॥ ७ ॥

जाउनि सांगा जयद्रथाला
जाण्यापूर्वी रवि अस्ताला
पाठवितों तुज यमसदनाला
भेटुन घे बांधवा ॥ ८ ॥

सप्तसिंधुतळिं बैस दडोनी
तिथेंहि तुजला शरें विंधुनी
वाहिन तव शीर्षास तोडुनी
अर्ध्य सूर्यदेवा ॥ ९ ॥

अभिमन्यूच्या वधानें अर्जुनाचा रागरंगच बदलून गेला. 'अर्जुन मृदु युद्ध करतो' हा धर्माचा आक्षेप त्यानें साफ धुवून काढला. दुसऱ्या दिवशीं त्यानें अपूर्व पराक्रम केला. कौरवांच्या सात अक्षौहिणी सैन्याचा त्यानें संहार केला. आणि द्रोण, कर्ण, अश्वत्थामा, कृप यासारखे पराक्रमी वीर जयद्रथाचे रक्षण करीत असतांनाही त्यां सर्वा समक्ष त्यानें जयद्रथाचा वध केला.

युद्धाचा पंधरावा दिवस उजाडला. त्यादिवशीं दुर्योधन-द्रोणांकडे गेला आणि नंतर :-

दुर्योधन–

सखा कर्ण परि तयास
अव्हेरुनि, आपणास
केले सेनापती
काय ही त्याची फलश्रुती ?
दिव्य जाणतां अस्त्रें आपण
नच शकतां वधुं कां पांडवगण ?
शिष्य तुम्हां ते प्रिय माझ्याहुन
तुम्हीच करितां त्यांचें रक्षण.
इच्छा एकच, करा याहुनी
प्रिय तुम्ही त्यांचें
एक शरानें तुम्हींच उडवा
हें मस्तक माझें.

ोण––

टोंचसि कां शब्दानीं ?
कळलें काय मनीं
शिष्य न तूं, गुरु ना मी
सेवक मी, तूं स्वामी
शब्द शब्द तुझा जाळतो कणाकणास
क्रोध पेटला उरांत
आस तुझी पुरविण्यास
दिव्य ब्रह्मास्त्र हें सोडुन या क्षणी
पांडवसैन्यें मीं टाकतों जाळुनी
ज्ञान न ज्या अस्त्रांचे
करतों मी वध त्यांचें
भरतो तव तृप्तीस्तव
रांजण मी पापांचे.

युधिष्ठिर-- ब्राह्मतेज क्षात्रतेज
दोन होति एक येथ
जिंकण्यास या तेजा
देवेन्द्रहि ना समर्थ.

श्रीकृष्ण— अश्वत्थामा पुत्र याला
प्रिय असे प्राणाहुनीही
विकल होइल हा तयाची
मरणवार्ता ऐकुनीही.

भीम-- करितां कोणास्तव संहार ?
केन्द्रित आशा तुमच्या ज्यावर
ज्यास्तव करितां संगर तांडव
त्या पुत्राला वधुन आलों
करुनी अंत्यप्रहार.

द्रोण— हें असत्य वृत्त तूं
सांगतोस रे कुणा ?
चिरंजीव पुत्र मम
अवध्य ही सुरगणा
त्यासमान वीर तो
मी न काय जाणतो ?
वृद्ध नव्हे तरुण तो
दुजा द्रोण झुंजतो.

भीम-- सत्य सांगतों पहा निरखुनी
गदेवरी या रक्त कुणाचें ?
कालनिमंत्रण येतां ठरले
शौर्यहि अपुल्या व्यर्थ सुताचें
सांगितलें मी सत्य, न माना
खुशाल अपुली करा वंचना
ठरेल धर्महि असत्य वक्ता
रक्त नोळखी जेव्हां रक्ता

द्रोण--

सांगु दे हा भीम कांहीं
वृत्त परि हें सत्य नाहीं
सत्य नाहीं
सत्य नाहीं.
सुन्न होसी तूं मना कां ?
वृत्त हें रे
सत्य नाहीं
कां अशी अस्थीर होतो
आज परि ही चरणयुगुलें ?
वीरबाहूंनो, तुम्ही कां
गाळतां अवसान अपुलें ?
वामनेत्रा स्फुरसि कां तूं
अशुभ कां तुज कांहि दिसलें ?
भिवविती शंका तुम्हा या
असु शके कां सत्य असलें ?
विश्वसतां नच माझ्याबरती
विसे धर्म हा पुसा त्याप्रती
कां धर्मा तूं मला टाळसी ?
काय वसे रे तुझ्या मानसीं ?
सत्यधर्मा तूंच सांग रे सत्य मज
व्याकुळ पितृहृदय प्रार्थिते आज तुज
सांग रे सत्य मज.

कृष्ण—— बावरसी कां धर्मा ?
सत्य सांग निर्धारे
प्राणिमात्र रक्षी जें
असत्यही सत्यचि तें
धर्म जाणतोस तूं सांग रे खरे
द्रोण न तुज, विकल पिता
तव सैन्या हा हन्ता
वेचि नाशार्थ तुझ्या शौर्य आपुले.
तुजसाठीं प्राणपणा
लावुनि उभि तव सेना
रक्षि वा वधि तियेस एक अक्षरें
सांग रे खरे.

द्रोण—— विलंब कां करिसी धर्मा ?
कां वदन तुझें काजळलें ?
कां घर्मबिंदु हे भाळीं ?
मज सांग, रे काय घडलें ?
कोसळुं दे छत्र नभाचें
हें केलें मन वज्राचें
ऐकवी न ऐकायाचें
त्या वार्तेहुनही असले हें असह्य मौनच झालें
मज सांग, काय रे घडलें ?

युधिष्ठिर—— विदित असे जरि सारे मजला
कसें सांगु गुरुदेव तुम्हाला ?
अश्वत्थामा....अश्वत्थामा स्वर्गी गेला !

द्रोण—

अश्वत्थामा .... स्वर्गी गेला
अश्वत्थामा .... स्वर्गी गेला ?
या नेत्रांचा प्रकाश सरला !
अश्वत्थामा स्वर्गी गेला.
दिसे न भासे मजला कांहीं
शून्य मना या शून्य सर्वही
शून्य सर्वही ! शून्य सर्वही ! !

युधिष्ठिर—

थांबा गुरुदेव थांबा. अश्वत्थामा
कुशल अजुनही पुत्र आपुला
अश्वत्थामा गजेन्द्र गेला
गजेन्द्र गेला.

द्रोण—

दिसे न भासे मजला कांहीं
शून्य मना या शून्य सर्वही
शून्य सर्वही !
ये मृत्यो, ये, होई मजला
प्राणांचाही भार !
पंखाखाली तुझ्या देइ मज
अखेरचा आधार !!

द्रोणवधानंतर संतप्त झालेल्या अश्वत्थाम्यानें पांडवसैन्यावर नारायणास्त्र सोडलें. जो जो प्रतिकार करावा तो तो या अस्त्राचें सामर्थ्य वृद्धिगत व्हायचें असें या अस्त्राचें वैशिष्ठ्य होतें. श्रीकृष्णांना हें ठाऊक होतें.. त्यांच्या सूचनेवरून अर्जुनासह सर्व पांडवसैन्यांनीं आपलीं शस्त्रें खाली ठेवलीं आणि त्या अस्त्राला प्रमाण केला.

परंतु उग्रतेज भीमाला हें सहन झालें नाहीं. तो संतापानें अर्जुनाला म्हणाला, "अर्जुना, तू आपलें शस्त्र खाली ठेवू नकोस. हा तुझ्या युद्धकौशल्याचा अपमान आहे. कोण म्हणतो या नारायणास्त्राला प्रतिकार नाही? हा भीम त्याचा प्रतिकार करील." अशी गर्जना करत त्यानें युद्ध चालूच ठेविलें. त्याबरोबर नारायणास्त्राचें प्रखर तेज इतर सर्वांना सोडून भीमासभोंवती एकवटूं लागलें. भीम संपूर्णपणें ज्वालांनी वेढून गेला. आणि तरीहि असामान्य धैर्यानें तो त्याचा प्रतिकार करीतच राहिला.

सरते शेवटी श्रीकृष्ण व अर्जुन स्वतः त्या ज्वालांतून भीमाजवळ गेले. त्यांनी दोघांनीहि भीमाला शस्त्र खाली ठवावयास सांगितले. तरीहि भीमानें प्रतिकार चालूच ठेवला त्यामुळे नारायणअस्त्राचें तेज अधिक अधिक दाहक होऊ लागलें. शेवटी श्रीकृष्ण थोड्याश्या रागानें आणि थोड्याश्या समजावणीच्या स्वरांत भीमाला म्हणाले.

**श्रीकृष्ण :**

अस्थानीं हें शौर्य सर्व तव
अस्थानी प्रतिकार
भीमा, सोडी हा अविचार ।। धृ ।।

या नारायण अस्त्रासी
व्यर्थ झुंज कां तूं देसी ?
कां बल याचें अवगणसी ?
करि विवेक सारासार ।। १ ।।

प्रत्याघातें जर याचें
तेज उग्रतर व्हायाचें
फल ' नाश ' चि तव शौर्याचें
स्वयें कां उघडिसि मृत्युद्वार ।। २ ।।

लक्षसूर्य माध्यान्ह चें
तें दाहक तेज जयाचें
बल त्यापुढती तव कैंचें ?
ओळखी तुझा अधिकार ।। ३ ।।

क्षणतरी विचारी चित्ता
हा दिव्यास्त्रांचा वेत्ता
अर्जुन कां नमवो माथा
असुनही बाणसंभार ? ।। ४ ।।

सहज एक घेतां नमतें
हें अस्त्र स्वयें जर शमतें
कां दवडिसि तूं शौर्यातें ?
विनत हो हाच प्रतिकार ।। ५ ।।

कां शस्त्र न अर्जुनी त्यजसी ?
अडवितो गर्व कां तुजसी ?
नच मान भीरुता यासी
म्हणति या युक्त सुविचार ।। ६ ।।

'मोडूं', 'नच वाकायाचें'
हें शौर्य आत्मघाताचें
धर्मकार्य जीवन ज्यांचें
सूज्ञ जिंकतात विकार ।। ७ ।।

क्षण विनम्र जर कां होता
सर्वनाश ये परिहरता
कां गर्व ? कशास अहंता ?
हा धर्मविहित आचार ।। ८ ।।

द्रोणपर्व संपलें कर्णपर्व सुरु झालें. भीमाची दु:शासनाशी गांठ पडली. त्याला पाहिल्या बरोबर एका क्षणांतच लाक्षागृहापासून ते कौरवांनी द्रौपदीची विटंबना करी पर्यंतचे सर्व अपमानाचे प्रसंग भीमाच्या दृष्टीसमोर सर्रकन येऊन गेले. त्याच बरोबर त्याला आपल्या प्रतिज्ञेची तीव्रतेनें आठवण झाली. त्याच्या बाहूंत दहा सहस्त्र नागांचे बळ संचारलें. तो त्वेषानें दु:शासनावर चालून गला. दोघांत घनघोर युद्ध झालें. तो प्रसंग निवेदक सांगूं लागला.–

भीम :

लाक्षागृहसे पेटुन उठता
उरांतले अपमान
कृतांतसा कोपला घालतो
रणीं भीम थैमान ।। ध्रु: ।।

झडप घालुनी भीम लोळवी
क्षणांत दु:शासन
उभा राहिला कंठी त्याच्या
वामचरण रोवुन
दुंदुभि नादें कौरवास दे
पुन्हा पुन्हा आव्हान ।। १ ।।

" कुरुवीरांनो, हें शपथेचें
करतों मी पालन
समक्ष तुमच्या वधतों येथें
पापी दु:शासन
वज्रशक्तिशी माझ्या झुंजुन
रक्षा याचे प्राण ।। २ ।।

कुठे कर्ण तो लपला आता ?
कोठे दुर्योधन ?
धारण करता कशास शस्त्रें
भाराला कारण
समरांगण हें वाक्शूरांनो
नव्हे सभेचें स्थान ।। ३ ।।

व्याघ्रापरि मग भीष्म न्याहळी
सावज दुःशासन
थरथरला तो कौरव
होता रुद्र भीम दर्शन
तोच कडाडुन भीम देइ त्या
अखेरचें आव्हान ॥ ४ ॥

"थरथरतोसी आज भेकडा
आठव तव वर्तन
द्रौपदीस तूं सभेत आणिले
केश तिचे ओढुन
"षंढ" म्हणत तिजसमक्ष मज
तूं नाचलास बेभान ॥ ५ ॥

हिसडलेल तूं सभेत ज्यानें
याज्ञसेनिचे केश
त्या हाताचा रणांत दाखव
आज मला आवेश
पहा हिसडुनी मीच तयाला
करतों भ्रष्टस्थान ॥ ६ ॥

थांब, ऐकले हे तर अर्थे
तव पापा शासन
पहा टाकतों या मुष्टीनें
वक्ष तुझे भेदुन
तृषार्त या ओठास घडवितो
तव रक्ताचें पान" ॥ ७ ॥

शब्द न गेले भीमाचे हे
दिशास जो भेदुन
तसेंच घडले तोच दृश्य त्या
शब्दाहुन भीषण
भयार्त झाले रथी अतिरथी
नेत्रीं आले प्राण ॥ ८ ॥

पूर्ण प्रतिज्ञा करोनि यापरि
नाचे तो थयथय
कांपे धरणी कांपे अंबर
कांपे विश्वत्रय
विचलित झाला शेषहि
झाले विचलित श्रीभगवान् ॥ ९ ॥

क्रोधाचा आवेग संपता
तांडव तें थांबलें
भरुनी डोळे समोरचें मग
दृश्य तयें पाहिलें
विसरुनि गेला स्वतःस नुरले
युद्धाचेंही भान ॥१०॥

मनश्चक्षुच्या समोर त्याच्या
तोच उभी राहिली
खिन्न कांहिशी प्रिय कृष्णेची
कृश मूर्ती सावळी
कृष्णे कृष्णे म्हणे उभारुन
बाहू तो बलवान ॥११॥

" पहा हात हे त्या पाप्याच्या
रक्तानें माखले
हास जराशी आला तरि तूं
विसर दुःख अपुलें
धुतले तव मी कलंक कृष्णे
धुतले तव अपमान " ।।१२।।

प्रसन्न हसली त्यावर ती
मग तोही क्षण हांसला
क्षण दोघांनीं सुखद साजरा
केला तो सोहळा
क्षणि दुसऱ्यापरि तिची जाहली
मुद्रा फिरुनी म्लान ।।१३।।

विरघळला तो वज्रबाहु
ये नयनांतरि पाणी
कंठ दाटला येइ मुखातुन
कंपित मृदु वाणी
" क्षमा करी मज असे तुझ्या गे
चिरव्यथेची जाण ।।१४।।

गेला क्षण तो सभेतला गे
फिरुनी ना यायचा
कलंक माथी तुझ्या नि माझ्या
लागे परि शाश्वतचा
पुसट हो परी पुसे न कधिही
कुलस्त्रीचा अपमान "
सद्गदला तो भीम या परी
घालुनही थैमान ।।१५।।

युद्धाचा सतरावा दिवस उजाडला. ! अर्जुनाशीं निकराचें युद्ध करण्याच्या निश्चयानें कर्ण रणांत आला. दोघांचें युद्ध सुरु झालें. आकाश बाणांनीं भरून गेले. अर्जुन व कर्ण यांत सरस कोण नि निरस कोण हेच समजेना. आणि नेमक्या याच क्षणी...एकाएकी कर्णाला आपल्या अस्त्रांचे मंत्र आठवेनासे झाले. तो चरकला. पण तरीही त्यानें युद्ध तसेंच चालू ठेवले. तोंच...तोंच त्याच्या रथाची गती एकदम थांबली. त्याच्या रथाचें चाक पृथ्वीनें गिळलें होते. क्षणभर तो गांगरला. पण दुसऱ्याच क्षणीं त्यानें रथाच्या खाली उडी टाकली आणि आपलें सर्व सामर्थ्य पणाला लावून तें चाक तो वर काढूं लागला. पृथ्वी सातअंगळे वर उचलली गेली. पण रथाचें चाक बाहेर निघेना. आपला अंतकाळ कर्णाला समोर दिसूं लागला. त्याच्या डोळयांत अश्रू जमा झाले. आर्त स्वरात तो पृथ्वी मातेला उद्देशून म्हणाला——



## कर्ण :

सान थोर तूं भेद न करिसी
क्षमा म्हणति तू तें
मातेपरि कां माझ्या झालिस
कठोर भू-माते ? ।। धृ ।।

" जिंकिन अर्जुन, जिंकिन अर्जुन "
या ध्यासानें जगलों जीवन
निर्णायक चिर-वांछित तो क्षण
येतां गिळसी तू चक्रातें ।। १ ।।

दिव्य रथ धनू अक्षय भाता
कृष्ण सखा वर रथा नियंता
देवेन्द्रासम ज्यास रक्षिता
साह्य करिसि तूं त्या पार्थातें ।। २ ।।

कवच कुंडलें मज अंतरलीं
शक्ति वासवी तीहि हरपलीं
अस्त्रें शापित, निष्प्रभ ठरलीं
झुंजत असतां मी दैवातें ।। ३ ।।

काय तुझें कर्णा हें जीवन ?
तव जन्मासह जन्मे लांछन
तृप्त न तें तव जीवन ग्रासुन
मरणाच्याही येइ मागुतें ।। ४ ।।

कुठली आशा तुज विजयाची ?
संधिहि ना तुज झुंजायाची
ही परिसीमा दुर्दैवाची
वीर मरणही तुज आंचवते ।। ५ ।।

थांब अर्जुना, थांब क्षणभरी
उद्धरितों मी चक्र तोवरी
युद्धोत्सक मी परि माझ्या वरि
दैवि आपदा ही कोसळते ।। ६ ।।

धर्माची तुज ठाउक महती
विरथ उभा मी शस्त्र न हातीं
कां ऐशावरि प्रहार करती ?
धर्मयुद्धिचे नियम जाणते ।। ७ ।।

भ्यालों ना तुज नच वा कृष्णा
मरण भयानें ही न प्रार्थना
विझलि न अजुनी युद्ध–कामना
वीरोचित परि करुं युद्धातें ।। ८ ।।

त्रिभुवनांत तूं ख्यात धनुर्धर
होइ कलंकित यश शर आवर
क्षुद्र प्राण हे, विजय क्षुद्रतर
मळलें यश नच फिरुन उजळते ।। ९ ।।

'अर्जुना क्षणभर थांब' अशी कर्णानें केलेली प्रार्थना थेट अर्जुनाच्या अंत:करणाला जाऊन भिडली. हातांतील शस्त्र खाली ठेवलें आहे, डोळयात अश्रू जमा झाले आहेत अशा कर्णावर त्याच्याच्यानें शरवृष्टी करवेना. तो विचलित झाला. त्याची ही अवस्था श्रीकृष्णांच्या तात्काळ लक्षांत आली. न्यायनिष्ठुर श्रीकृष्णांनीं तात्काळ अर्जुनाला सांगितले, अर्जुना...

**श्रीकृष्ण :**

आकर्ण ओढुनी धनू अर्जुना
सोडी एकच बाण ॥ ध्रु० ॥
सुवर्ण संधी अशी न येइल
करि कर्णा निष्प्राण
जन्मभरी तव द्वेष करोनी
आज फेकि ह्या स्तुतिजाला
स्वयें गुंतुनी त्यांतचपार्था
विचलित कां तूं रथी बैसला ?
धन्य कर्ण हा अचूक करि
तव मर्मावर संधान, अर्जुना ॥ १ ॥
सूर्यापोटीं जन्म लाभला
आवड ह्याला तमोगुणांची
पराक्रमाचे बाहु लाभले
वर्तणूक परि भ्याडाची
वधास येउन तुझ्या, मागतो
भीक्षा आपुते प्राण अर्जुना ॥ २ ॥
आयुष्याच्या सरत्या क्षणि ह्या
धर्म आठवे कर्णा का
धर्म रक्षितो पार्था त्यांना
रक्षितात जे धर्माला
खलेश्वराच्या मुखि धर्माचा
उच्चारहि अवमान, अर्जुना ॥ ३ ॥
शस्त्र त्यागुनीं विरथ उभा हा
अश्रु दाटले या नयनीं
अनुकंपित कां म्हणुनी होसी
दया शत्रुवर अस्थानी
देई जो जें तें त्या लाभे
ही तर नीती जाण, अर्जुना ॥ ४ ॥

असाच होता विरथ रणांगणि अभिमन्यू जेव्हां
धनुष्य तोडुनि शस्त्रहीन त्या कुणि केले तेव्हां ?
पडले तुटुनी त्या एकावर वीर सात मिळुनी
धर्मयुद्धिचा पंडित होता हा त्यांचा अग्रणी
तुझ्या कुमारा दाखविली कां दया कुणी त्यांनी ?
करुनी पारध पशुपरि त्याचें रक्त सांडलें रणीं
रक्त माखलें हात तेच तुज मागति जीवनदान ॥ ५ ॥

भाग्यचक्र तें फिरतां आली सभेंत पांचाली
धर्मज्ञांच्या माना झाल्या लाजेनें खाली
आनंदाच्या उर्मि दाटल्या तेव्हां यांच्या मनीं
" वस्त्र हरा रे हिचे " उमटली याच मुखीं वाणी
" षंढ पतींना सोडुनि वरि तू कौरववीरांना
तृप्त करुनि घे त्यांच्या संगे तूं भोगेच्छांना "
सतीस या परि विटंबुनी हो पवित्र जी वाणी
धर्म सांगते आज तुला ती येथें अवतरुनी
ोइल, होवो कीर्ति कलंकित दे कर्तव्या मान
रक्षि धर्म तूं तुच्छ त्यापुढे कीर्तीचा अभिमान ॥६॥

रथचे चाक बघ भूमीलाही
असह्य याचा भार
निर्यतिनेंच हा अटळ ठरविला
कर्णाचा संहार
तूं पार्था तर निमित्त केवळ
ठेव अंतरी जाण
कंठनाल हा अचूक छेदुनि
घें कर्णाचे प्राण ॥ ७ ॥

युद्धाच्या अठराव्या दिवसाचा प्रसंग ! दुर्योधन आपली माता गांधारी हिच्या दर्शनाला गेला. त्यानें तिला प्रणाम केला आणि प्रार्थना केली, "आई, 'विजयी हो' असा तूं मला आशीर्वाद दिलास तर तुझ्या आशीर्वादाच्या प्रभावानें मी अजूनही या युद्धाचा रंग पालटवूं शकेन."

आपलें न ऐकतां हट्टानें आपल्या नव्याणव पुत्रांच्या वधाला कारण झालेला आणि तरीही आपला अखेरचा राहिलेला पुत्र आशीर्वाद मागतो आहे आणि तोही अधर्माच्या विजयासाठी ! ! आयुष्यभर अंतःकरणांत प्रज्वलित धर्मबुद्धी जागृत ठेवणाऱ्या गांधारीवर केवढा कठीण प्रसंग हा ? खिन्न स्वरांत ती दुर्योधनाला म्हणाली.

# गांधारी

आशीर्वच मी काय देउ तुज ?
जय लाभो, जय लाभो, जय लाभो धर्माला ॥धृ॥
चरणावरती मस्तक नमविसि
इच्छा माझ्या पदीं तुडविसी
बंधुघातक्या कशा थांबसी ?
जाइ, तुझ्यास्तव काल थांबला ॥ १ ॥
वृथा भिजविसी कशास चरणा ?
हृदयिं धर्म या तया न करुणा
अखेर प्रेमहि फक्त भावना
पान्हा उरि या कधीच थिजला ॥ २ ॥
कां दुर्दैवा घेसि कसोटी ?
जीवन स्त्रीचें पुत्रासाठीं
पुत्र देउनी असला पोटीं
शापिलेस कां मातृत्वाला ? ॥ ३ ॥
थांब निघाला वत्सा कोठे ?
फिर माघारी शपथ घालतें
अखेरचे क्षण हेच धांवते
ठेवा उरल्या जीवनांतला ॥ ४ ॥
घेतें पिउनीं या कर्णांनीं
अखेरची तव वत्सा वाणी
स्पर्श तुझा हा ही मज स्मरणी
मार्ग क्रमाया खडतर उरला ॥ ५ ॥
आशीर्वच घे तुज मातेचा
लाभो मृत्यू तुज वीराचा
ठरं दे क्षण तरि तव अंताचा
अभिमानाचा तुजला, मजला ॥ ६ ॥

युद्धाच्या अठराव्या दिवशीं पराभूत झालेला दुर्योधन एका डोहांत लपून बसला. ही वार्ता युधिष्ठिराला कळतांच तो आपल्या बंधूंच्यासह त्याठिकाणीं गेला. आणि त्यानें दुर्योधनाला युद्धाचें आव्हान दिलें. तो म्हणाला, "दुर्योधना, भ्याडासारखे लपून बसणें तुला शोभत नाही. चल डोहाच्या बाहेर यें. युद्ध कर आणि क्षात्रधर्माला जाग."

संतापानें दुर्योधन डोहाच्या बाहेर आला आणि उलट धर्माला म्हणाला, "युध्दाला काय किंवा मृत्यूला काय मी भीत नाही. पण मी एकटा आणि तूं असा ससैन्य आलेला ! हे काय धर्मयुध्द आहे? एकेकट्याने कोणीही माझ्याशी युध्द करावें."

आणि नेमके याठिकाणीं युधिष्ठिराचें औदार्य जागृत झालें. त्यानें कोणताही विचार न करतां दुर्योधनाला ताडकन उत्तर दिलें, "ठीक आहे. दुर्योधना, तुला पाहिजे त्या पांडवाशी पाहिजे त्या शस्त्रानें तूं युध्द कर. या युध्दांत तूं विजयी झालास तर तुझें राज्य मी तुला परत देईन."

बलरामाचा पट्टशिष्य दुर्योधन हा गदायुध्दांत केवळ अद्वितीय होता. शरीर सामर्थ्याच्या जोरावर भीमच काय तो त्याला प्रतियोध्दा म्हणून उभा रहाण्याच्या योग्यतेचा होता. अशी वस्तुस्थिती असताना धर्मानें याप्रकारचें अभिवचन दिलें. ज्यावेळीं दुर्योधनावर अखेरचा घाव घालून कौरवांच्यावर विजयाची पूर्णता करावयाची त्याक्षणीं धर्माला अस्थानी औदार्य आठवलें. आणि अठरा दिवसांच्या पराक्रमानें जें मिळवून आणलें तें एका अभिवचनानें तो घालवावयास निघाला हें पाहून श्रीकृष्णांना संताप आला. ते म्हणाले–

**श्रीकृष्ण :**

देसि कुणा वचन काय तूं न पाहिले ?
धर्मा तूं पुनरपि कां द्यूत मांडिलें ? ॥ धृ० ॥

करुयुद्धी शेवटचा
क्षण येता विजयाचा
अविवेके असल्या तूं काय साधले ? ॥ १ ॥

जन्म वैरि दुर्योधन
सुखविशि त्या मुक्त करुन
सुहृद मात्र संकटात अचुक गोविलें ॥ २ ॥

गदायुद्धि यासमान
एकच बलराम जाण
रामतेज येथ दिसे, पूर्ण प्रगटले ? ॥ ३ ॥

धर्मयुद्धि नियमांनीं
जिंकिल कां यास कुणी ?
शत्रूबल तुजविण ना कुणी उपेक्षिलें ॥ ४ ॥

पांडवांत यास कोण
प्रति योद्धा भीमाविण
मशकासम चिरडिल हा अन्य पांडवे ॥ ५ ॥

वधुनि उद्या नकुलाला
मिळविल हा राज्याला
भोग तूंहि वचनांचीं आपुल्या फळें ॥ ६ ॥

दिसतें हें विधिलिखीत
राज्या न तव संचितांत
भिक्षार्जित-जीवनार्थ पार्थ जन्मले ॥ ७ ॥

पांडवांच्या सुदैवानें कृष्णाची भीति खोटी ठरली. आपल्या नव्याणव बंधूच्या वधाला कारण झालेल्या दुर्योधतानें भीमाशीच युद्ध करण्याचानिर्णय घेतला दुर्योधनाचें तुमुल गदायुद्ध झालें आणि त्यात भीमानें आपल्या गदेचा तडाखा देऊन दुर्योधनाची मांडी फोडली. दुर्योधन खाली कोसळला. संतापलेल्या भीमानें त्याच्या मस्तकावर लाथ माररी.

एकेकाळचा कुरुसम्राट दुर्योधन आपल्याच कृत्यांनीं आज धुळीत लोळण घेत होता. अशा स्थितीत श्रीकृष्ण त्याच्याजवळ गेले व त्यांनी दुर्योधनाला विचराले, "दुर्योधना, तुझ्या आयुष्याची ही परिणती पाहिलीस ना ? आतां तरी आपल्या गतकृत्यांचा तुला पश्चात्ताप होतो कां ? " तेव्हां तश्याही स्थितींत दुर्योधनानें आपलें मस्तक दोन हातावर तोलून धरले आणि शेपूट ठेचलेला नाग जसा फणा काढतो तसें मस्तक उंच करून तो कृष्णाला म्हणाला.

# दुर्योधन

हिणविसि मजला पुन्हा पुन्हा का गो-कुळिच्या पोरा
माझ्यासम जन्मला कुणी कां भाग्यवंत दुसरा ?......॥ ध्रु० ॥

प्रहार मांडीवर करण्याला
तूंच खुणविले या भीमाला
अधर्मयुद्धे मारुनि मजला
निंदसि वर वीरा ॥ १ ॥

बलरामाच्या संन्निध राहून
कष्टें केले मी विद्यार्जन
गदायुद्ध तर अजोड होउन
तोषाविले हलधरा ॥ २ ॥

पराक्रमानें नृपा नमविले
सुहृदा आप्ता मी तोषविले
ऐश्वर्याचे भोग भोगले
दुर्लभ जे सुरवरां ॥ ३ ॥

पाहुनि माझे निवले लोचन
भीम कंठितो बल्लव-जीवन
नाचविला षंढासम अर्जुन
सखा तुझा यदुवरा ॥ ४ ॥

जराजीर्ण विकलांग होऊनी
भेट मृत्युची व्हावी शयनी
दुर्भाग्याचे अन्य याहुनी
असे काय वीरा ॥ ५ ॥

जीवन जगलों सम्राटाचें
मरण कवळितों मी वीराचे
स्वागत करिती सुर स्वर्गाचे
उघडोनी द्वारा ॥ ६ ॥

खेद न मजला कोसळल्यावरि
भीम लाख जरि लत्ता मारी
स्पर्शति अंती गिधाड धारी
नाशवंत शरिरा ॥ ७ ॥

हतबांधव हे आता पांडव
या पृथ्वीचे भोगो वैभव
स्वर्लोकी मी जाइ सबांधव
ही तर मुक्ति परा ॥ ८ ॥



समोर साक्षात् मृत्यु उभा असतानाहि दुर्योधनाचा स्वभाव बदलला नाहीं. बरोबरच आहे. गुरुजनांचे उपदेश आणि मातेच्या डोळयांतील अश्रूही ज्याला बदलू शकले नाहींत त्यासमोर मृत्यु बापडा कोण ? आपल्या स्वतःच्या अहंकारासाठीं संपूर्ण कौरवकुलाच्या निर्दालनाला कारणीभूत झालेल्या दुर्योधनाचा शेवट त्याला साजेसाच झाला.

वास्तविक त्यानें जें भाषण केलें तें सत्वाच्या कसोटीला टिकणारे नाहीं. ज्या पांडवांनीं शेवटपर्यंत त्याला आपला म्हणून सांभाळून घेण्याचा प्रयत्न केला त्यांनाच शत्रू मानून त्यांची अवहेलना करण्यांत त्यानें धन्यता मानली. आणि त्यातही स्वतः मोठा पराक्रम गाजवला होता असेंहि नाहीं

परंतु तरीही... ज्या निर्भयतेनें आणि तेजस्वितेने तो मृत्यूला सामोरा गेला ती निर्भयता आणि तेजस्विता अंतःकरणाला स्पर्शून जाते.

महाभारतकारांना हेंच तर सांगायचे नाहीं ना ? दुर्योधनाचा वध झाला येथेंच हे गीतामहाभारत संपलें. एक ऋण उरलें आहे. त्यातून मुक्तता होणार नाहीं. तरीहि महाभारताचे रचनाकार मुनिवर्य व्यास यांना प्रणाम आणि पूजा –ती करण्याची योग्यता नसतांहि.

# निवेदक ( व्यासपूजा )

पुष्पें तुमचीं गुंफुनिया मी, तुम्हा वाहिला हार
श्री व्यासा या पूजेंचा तुम्हि, कराल ना स्वीकार? ॥धृ॥

न सता माझी मुळिही योग्यता
स्पर्शियले मी महाभारता
अंतर्ज्ञानी तुम्हिच जाणता
माझें प्रेम अपार ॥ १ ॥

आजहि घडते तसेंच भारत
तसाच होई धर्म पराजित
टाळ शांतिचे तसेंच बडवित
सुजन घेति माघार ॥ २ ॥

तसेंच कपटानें दुर्योधन
राज्यभाग बसले बळकावुन
निष्फळ ठरले तसेंच विनवुन
सामाचें उपचार । ३ ॥

तसेंच अजुनी अमुचे अर्जुन
आप्त विरोधक समोर पाहुन
मोहानें त्या स्वकीय मानुन
करु शकती न प्रहार ॥ ४ ॥

आजहि क्रंदन पांचालीचे
हृदय विध्द करि सन्त जनांचे
कुठें बाहुपरि त्या भीमाचे ?
द्यावयास आधार ? ॥ ५ ॥

अधर्म राही जळस्थळ व्यापुन
कष्टी सज्जन सुखांत दुर्जन
जनांतुनी कां परि न जनार्दन
घेइ नवा अवतार ? ॥ ६ ॥

सुखी निरामय समृद्धीचे
जीवन होवो जगि सर्वांचें
वांच्छित अपुल्या अजुनि मनीचे
झाले ना साकार ॥ ७ ॥

पाहुनि ही स्थिति मन व्याकुळलें
चरण आपुले शोधित आले
प्रणतावर या मुक्त उधळले
तुम्ही तेज भांडार ॥ ८ ॥

ज्ञानभास्करा, त्या तेजातुन
वेचियले मी जे हे कण कण
द्या आशीर्वच "घेवो त्यांतुन
'नव भारत' आकार. ॥ ९ ॥

— श्रीकृष्णार्पणमस्तु —

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
दा. क्र. ९६२९८

REFBK-0016294
REFBK-0016294